
शासनमान्य यादीतील क्र. १२८/२०१०


# श्री क्षेत्र चिंतामणी कळंब

## (Shri Kshetra Chintamani Kalamb)

### श्री गंगा आगमनाच्या विशेष माहितीसह








डॉ. पवन मांडवकर

ISBN 978-81-925945-0-7
Published by a Government Recognized National Level
Publisher under Peer Review System

शासनमान्य यादीतील क्रमांक १२८

'श्री क्षेत्र चिंतामणी कळंब'चा
थोडक्यात परिचय करून देणारी कलाकृती

# श्री क्षेत्र चिंतामणी कळंब

## डॉ. पवन मांडवकर

**डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र**
इंदिरा महाविद्यालय, कळंब
जि. यवतमाळ ४४५४०१
भ्रमणध्वनी ९४२२८६७६५८
Email: marathipradhyapak@gmail.com

**मूल्य पन्नास रुपये**

ISBN 978-81-925945-0-7
शासनमान्य यादीतील क्रमांक १२८

- **श्री क्षेत्र चिंतामणी कळंब**
  (Shri Kshetra Chintamani Kalamb)
- लेखक/मुखपृष्ठ/अक्षरजुळणी
  © **प्राचार्य डॉ. पवन मांडवकर**
  (© Principal Dr. Pavan Mandavkar)
- लेखक - संपर्क - भ्रमणध्वनी: +91-9422867658
- Email: pavanmandavkar@yahoo.com

- प्रती **1000**
- आकार **क्राऊन**
- मुखपृष्ठ **फोर कलर**

- प्रकाशक/मुद्रक
  **डॉ. सौ. वीरा मांडवकर**
  डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र,
  इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ,
  महाराष्ट्र India 445401, भ्रमणध्वनी: 9403014885

- **15/10/2021**

- **मूल्य 50 रुपये**

# श्री क्षेत्र चिंतामणी कळंब

## विद्या आणि कलेचा अधिपती : श्रीगणेश

कुठल्याही नवीन कामाचा प्रारंभ आपण श्रीगणेशाच्या नामस्मरणाने करतो. सणासुदीला पहिली आरती म्हटली जाते ती गणपतीची. बाळगोपाळांपासून तर ज्येष्ठांपर्यंत सर्वांनाच हे दैवत एक कुतूहलाचाही विषय ठरतं. महाराष्ट्रात गणेशाइतकं प्रिय दैवत दुसरं नाही. गणपती हा चौदा विद्या आणि चौसष्ट कलांचा अधिपती आहे. गणेशालाच बुद्धीची देवताही म्हटलं जातं. त्याचं नातं सर्वच कलांशी जोडलं जातं. चार वेद, सहा शास्त्रे आणि अठरा पुराणे ही गणरायाची रूपं आहेत.

आपल्या देशात गणपतीची उपासना फार पूर्वीपासून केली जाते. काळानुरूप ती सांगितली गेली आहे. आख्यायिका आणि पौराणिक कथांवरून असे जाणवते, की ज्या वेळी समाजात राक्षसांचे प्राबल्य वाढले आणि त्यांनी माणसांचा छळ सुरू केला, त्या वेळी राक्षसांचा संहार करण्यासाठी वेगवेगळ्या रूपांत देवीदेवतांचे अवतार निर्माण झाले. गणांचा अधिनायक आणि सेनापती असलेल्या गणपतीनेही दुष्ट, दुर्जन राक्षसांचा संहार केला.

दुष्टांचे निर्दालन आणि धर्माची स्थापना याकरिता परमेश्वर अवतार घेतात असे म्हटले जाते. मुद्‌गल पुराण आणि गणेश पुराणात गणपतीच्या विविध अवतारांचे वर्णन आले आहे. गणेश पुराणात गणपतीचे चार प्रमुख अवतार सांगितले आहेत. कृतयुगात - विनायक, त्रेतायुगात - मयुरेश्वर, द्वापारयुगात - गजानन आणि कलियुगात - धूम्रकेतू असे ते अवतार आहेत. मुद्‌गल पुराणात गणपतीचे वक्रतुंड, महोदर, गजानन, लंबोदर,

विकट, विघ्नराज आणि धूम्रवर्ण असे आठ अवतार मानण्यात आले आहेत.

गणपतीच्या 24 अवतारांसंबंधी एक कथा आहे. एकदा ब्रह्मदेव ध्यानस्थ बसले होते. त्यांच्या शरीरापासून चतुर्मुख, चतुष्पाद अशी अतिशय सुंदर परप्रकृतीची एक मूर्ती निर्माण झाली. ब्रह्मदेवाने तिला गणपतीची तपश्चर्या करून सृष्टीची रचना करण्याची आज्ञा दिली. त्या मूर्तीने उग्र तपश्चर्या करून गणपतीला प्रसन्न करून घेतले. त्या वेळी गणपतीने सांगितले की, 'तू मला चार प्रकारांनी प्रिय होशील. सर्व तिथींची तू माता होऊन तुला चतुर्थी असे म्हणतील. तुझा डावा भाग काळा आणि उजवा भाग पांढरा असेल. चतुर्थी ही तुझी जन्मतिथी होईल. जे लोक चतुर्थी करतील, त्यांचे मी पालन करीन.' म्हणून वर्षाच्या बारा महिन्यांत शुक्ल आणि कृष्ण पक्षातील चतुर्थी या गणेश जन्माच्या तिथी आणि त्यानुरूप गणपतीचे चोवीस अवतार मानण्यात येतात. कृष्ण पक्षातील चतुर्थीला 'संकष्टी' तर शुक्ल पक्षातील चतुर्थीला 'विनायकी चतुर्थी' असे म्हणतात.

गणपतीने ज्या राक्षसांचा संहार केला, त्या राक्षसांनी प्रथम शुक्राचार्यांनी सांगितल्यानुसार मंत्र म्हणून तपश्चर्या करून शंकराकडून वरदान मागून घेतले होते. तसेच त्या दुष्ट प्रवृत्तीच्या राक्षसांनी त्या वराचा दुरुपयोग करून सर्वांना त्रास दिला. त्यांनी देवांनाही त्रास दिल्याने देवांनी ब्रह्मदेवाजवळ प्रार्थना केली. ब्रह्मदेवाने देवांना गणपतीची उपासना करण्यास सांगितले. त्यानुसार गणपतीने विविध अवतार घेऊन राक्षसांचा संहार केला तर काही वेळा राक्षसांना शरण येण्यास भाग पाडले. गणपतीने अहं, कामासुर, मदासुर, क्रोधासुर, मत्सरासुर, ममतासुर आदी राक्षसांचा नाश केला. काम, क्रोध या शक्ती असून त्या जर वाईट

उद्देशाने वापरल्या तर त्यापासून नाशच होतो, हे या उदाहरणावरून स्पष्ट झाले.

गणपती राजकारणपटू आणि गनिमीकाव्याचा जनक मानला जातो. तो गाणारा आणि नृत्य करणारा म्हणूनही ओळखला जातो. नाटक, दशावतार, तमाशातही गणपतीची रूपे आढळतात. दशावतारात गणपतीचा मुखवटा घातलेला कलाकार असतो. तमाशातील 'गण' म्हणजे 'गणेश नमन'च होय.

सृष्टीत सर्वप्रथम ॐकार निर्माण झाला. हा ॐकार गणपतीचेच रूप आहे. ॐकाराशी जवळचे नाते सांगणारे 'गम' हे गणपतीचे बीजाक्षर असून त्याचा सर्वत्र संचार दिसून येतो. दोन तंबोरे विशिष्ट पद्धतीने लावले तर एकातून 'सा' आणि दुसऱ्यातून 'गम' असा उच्चार निर्माण होतो.

गणेशालाच जगातील पहिला लघुलेखक मानले जाते. व्यासांनी सांगितलेले महाभारत गणेशानेच लिहून काढले. जगातील पहिले स्त्री सैन्य गणपतीने निर्माण केले. राक्षसांशी लढताना गणपतीचे सैन्य (गण) थकले, तेव्हा गणपतीने आपल्या पत्नीला सर्व सख्यांसह आघाडी सांभाळण्यास सांगितले.

गणपती हा गुणांचा देव असून त्याला 'गुणेश' असेही म्हटले जाते. गणपती ही बुद्धी आणि विद्येचीही देवता आहे. गणपतीचे शौर्य, मुत्सद्दीपणा, नेतृत्वगुण, सारासार विचार करण्याची वृत्ती, तीक्ष्ण दृष्टी, स्त्री दाक्षिण्य, शक्ती कमी पडता युक्तीने काम करण्याची पद्धत, शत्रूला जेरीस आणण्यास गनिमी कावा हे गुण पौराणिक कथांमधून प्रगट होतात.

आपल्या संस्कृतीनुसार स्वर्ग, मृत्यू आणि पाताळ अशा तीन संकल्पना आहेत. या तीनही लोकांचे प्रत्येकी सात भाग मानण्यात आले आहेत. त्या सर्वांची बेरीज एकवीस होते. दुसऱ्या एका मान्यतेनुसार अष्टदिशा, अष्टसिद्धी आणि गणेश पंचायतन

म्हणजेच गणपती, शंकर, विष्णू, सूर्य आणि अंबामाता असे एकत्र केले की त्यांची संख्या एकवीस होते. त्यामुळे गणेश उपासनेत 21 ला महत्त्व आहे. गणपतीला 21 दुर्वा वाहतात, 21 मोदकांचा प्रसाद चढवतात. गणपती हा देवांचा सेनापती असून 21 सैनिकांचा एक गट, अशा 21 गटांचा एक गट अशी त्याच्या सैन्याची रचना असायची.

गणपतीला लाल रंग प्रिय आहे. त्यामागे अशी कथा आहे की, गणपतीने सिंदुरासुर राक्षसाचा वध केला. तेव्हा गणपती त्याच्या रक्तात न्हाऊन निघाला, म्हणून त्याचा रंग लाल झाला. मंगळ म्हणजे 'अंगारक' हे गणेशाचे रूप असून त्याचाही रंग लाल आहे.

धर्मशास्त्रानुसार गणपतीचे विसर्जन पाण्यात केले जाते. उजव्या सोंडेचा गणपती कडक मानला जातो. मूर्तीमध्ये महाराष्ट्रातील गणपतीचा डावा दात तर दक्षिणेत गणपतीचा उजवा दात मोडलेला दाखवतात. महाराष्ट्रात गणपतीला अष्टसिद्धीनायक तर दक्षिणेकडे ब्रम्हचारी मानण्यात येते.

## विदर्भ भूमी

विदर्भ भूमी ही आज जरी महाराष्ट्राचा एक भाग असली तरी पूर्वी हा स्वतंत्र भाग होता. 'विगतः दर्भाः यस्मात् स विदर्भः' असे म्हटले जाते. दर्भ म्हणजे गवताचा एक प्रकार. जिथे दर्भ असते तिथे दुसरे काहीच उगवत नाही, पेरता येत नाही. ज्या प्रदेशातून दर्भ निघून गेले, तो प्रदेश, ती जमीन शेतीकरिता उत्तम समजली जाते. त्यालाच विदर्भ म्हणतात. अजिंठ्याच्या लेण्यांपासून वैनगंगेपर्यंतच्या प्रांताला विदर्भ म्हणायचे. वरदातट

किंवा वरदाटक यांवरून ‘वऱ्हाड’ व पुढे ‘विदर्भ’ असे म्हटले गेले. विदर्भाला ‘नंदीवर्धन’ (नंदरधन) असेही म्हटले जायचे.

येथे वैदिक काळापासून अनेकांनी राज्य केले आणि विविध राजधान्या निर्माण केल्या. वाकाटकांची वत्सगुल्म म्हणजे आजचे वाशिम ही राजधानी होती. शिवाय भद्रावती (भांदक), कुंडीनपूर (कौंडण्यपूर), भोजकटक (भातकुली), नागभूमी (नागपूर), लोणार, आदासा, औदुंबर क्षेत्र (उमरखेड), इंद्रपुरी (अमरावती), श्री क्षेत्र माहूर, वणी अशी काही इतिहासातील उदाहरणे देता येतील.

ऋग्वेदाच्या निर्मितीपूर्वी विदर्भ ही यज्ञभूमी होती. या भूमीत अनेक संतमहंत होऊन गेले. महर्षी मुद्‌गल, महर्षी गृत्समद, महर्षी अत्री, महर्षी अगस्ती, चक्रधर स्वामी, श्री नृसिंह सरस्वती, अगस्तीपत्नी लोपामुद्रा, दत्तमाता देवी अनसूया, परशुराममाता देवी रेणुका असे अनेक दैवी किंवा ऋषितुल्य अवतार येथे झाले. आधुनिक काळात संत गजानन महाराज, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, संत गाडगेबाबा, संत गुलाबराव महाराज, संत पाचलेगावकर महाराज, श्री पुंडलिक महाराज, नगाजी महाराज, लहानुजी महाराज, खटेश्वर महाराज, आर्वीच्या संत मायबाई अशी अनेक संत मंडळी येथे होऊन गेली.

दण्डी, भवभूती, राजशेखर असे प्रथितयश प्राचीन कवी येथेच झाले. कवीकुलगुरू कालिदास आणि त्यांचे ‘मेघदूत’ हे विदर्भाचेच वर्णन करण्यात रमल्याचे निदर्शनास येते. मराठीतील आद्‌यकवी मुकुंदराज त्यांचा मराठीतील पहिला पद्‌यग्रंथ ‘विवेकसिंधू’ येथेच निर्माण झाला. चक्रधरांच्याही लीळा ह्याच भूमीत निर्माण झाल्या.

भगवान श्रीकृष्णाला आपलसं करणाऱ्या देवी रुक्मिणीचा, नलाची पट्टराणी दमयंतीचा हा प्रदेश. छत्रपती शिवबांच्या मातेचे हे माहेर. या प्रदेशात सर्व धर्माची, जातीची, पंथाची माणसे

आढळतात. हिंदू संस्कृतीतील साडेतीन शक्तिपिठांपैकी एक रेणुकामातेचे श्री क्षेत्र माहूर, जैनांचे तीर्थक्षेत्र मुक्तागिरी, बंजारा समाजाचे पोहरादेवी याच प्रदेशात आहे.

## वैदर्भीय अष्टविनायक

विदर्भातील अष्टविनायकांमध्ये खालील गणेशस्थाने मोडतात.

1. आदासा गणेश - नागपूरपासून 37 किलोमीटर अंतरावर सावनेर तालुक्यात आदासा हे ठिकाण आहे. येथील गणपतीला श्री विघ्नेश असे म्हणतात. टेकडीवर असलेली गणेशाची भव्य मूर्ती चित्त वेधून घेते.

2. कळंबचा श्री चिंतामणी - यवतमाळ-नागपूर मार्गावर यवतमाळपासून 23 किलोमीटरवर कळंब असून येथील श्री चिंतामणीचे देवस्थान आगळेवेगळे व जागृत म्हणून प्रसिद्ध आहे.

3. केळझरचा सिद्धिविनायक - वर्धा जिल्ह्यातील केळझर या गावाची प्राचीनता महाभारतकालीन आहे. उजव्या सोंडेची 4 फूट उंचीची गणेशाची मूर्ती आकर्षक आहे.

4. पवनीचा सर्वतोभद्र - भंडारा जिल्ह्यातील वैनगंगेच्या काठावर वसलेल्या पवनी ह्या गावात झोपडीवजा ओसरीत एक गणेशपट्ट आहे. त्याचा स्तंभ 3 फूट उंच आहे.

5. भद्रावतीचा वरदविनायक - चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती तालुक्यात भद्रावतीपासून सुमारे तीन किलोमीटर अंतरावर गावराळा टेकडी आहे. तेथील सर्वोच्च स्थानावर श्रीवरद विनायकाची भव्य मूर्ती आहे.

6. मेंढ्याचा श्रीभृशुंडगणेश - भंडाऱ्याच्या पूर्वेस तीन किलोमीटर अंतरावर मेंढा हे गाव आहे. तेथे घुमटीत एक गणेशप्रतिमा असून

ती काहीशी चमत्कारिक वाटते. मानवाच्या मुखासारखी ही प्रतिमा आहे. तिची उंची आठ फूट तर रूंदी चार फूट आहे.

7. रामटेकचा अष्टदशभूज - नागपूर जिल्ह्यातील रामटेक या गावाचे उल्लेख प्राचीन वाङ्मयातही आहेत. श्रीरामाचे स्थान, रामाचे यादवकालीन मंदिर, महाकवी कालिदासाचे निवास, श्रीमंत भोसल्यांचे कुलदैवत असलेली दशावतारी प्रतिमा जिला अठरा हात आहेत, तिला अष्टदशभूज गणेश म्हणून ओळखतात.

8. नागपूरचा टेकडीगणेश - नागपूर शहरात सीताबर्डीजवळील टेकडीवरील श्रीगणेश हा जागृत म्हणून प्रसिद्ध आहे. हे मंदिर 15 व्या शतकातील गोंड राजाच्या काळातील आहे.

# श्री क्षेत्र चिंतामणी कळंब

अखंड भारतातील जी एकवीस गणेशस्थानं गणेशपुराणात वर्णिली आहेत, त्यातील एक स्थान म्हणजे विदर्भातील यवतमाळ जिल्ह्यातील श्री क्षेत्र चिंतामणी कळंब. पश्चिम महाराष्ट्रात ज्या गणेशमूर्तींची अष्टविनायकात नावे आहेत, त्यात ही कळंबनगरीची मूर्ती नाही; परंतु अठरा पुराणांपैकी आठव्या शतकात भृगू ऋषींनी रचलेल्या गणेशपुराणात आणि त्यानंतर मुद्‌गल ऋषींच्या मुद्‌गलपुराणात या गणपतीच्या स्थापनेच्या आणि महात्म्याच्या कथा आलेल्या आहेत. त्यावरून या गणेशस्थानाचं प्राचीनत्व इंद्रकाळात पोचतं. विदर्भात अशी पौराणिक आणि ऐतिहासिक पाश्र्वभूमी लाभलेली काही गणेशमंदिरे आहेत, त्यापैकी हे एक आगळंवेगळं देवस्थान. पूर्वी श्री क्षेत्र चिंतामणी म्हणून ओळखली जाणारी ही कदंबनगरी म्हणजे आजचे कळंब.

या गणेशमूर्तीच्या स्थापनेबाबत गणेशपुराणातील कथा अशी की ब्रह्मदेवाची सुस्वरूप कन्या अहिल्या हिच्या सौंदर्यावर

भाळून देव, दानव, यक्ष, किन्नर, गंधर्व, नाग, राक्षस, ऋषी, मुनी इत्यादी सगळेच तिची अभिलाषा धरून ब्रह्मदेवाकडे मागणी करू लागले. ब्रह्मदेवांनी अहिल्येच्या विवाहासाठी पण जाहीर केला, की जो कोणी पृथ्वीप्रदक्षिणा करून सर्वात आधी सभामंडपात पोचेल, त्यालाच अहिल्या पत्नी म्हणून प्राप्त होईल. पण ऐकताच सगळेच आपापल्या वाहनाने पृथ्वीप्रदक्षिणा करण्यास त्वरेने निघाले. आर्यावर्तातील गौतम ऋषींनाही अहिल्येच्या प्राप्तीची इच्छा होती. त्यांनी गंगेवर जाऊन शुद्धोदक स्नान केलं आणि आश्रमातील प्रसूतशील गाईला मनोभावे प्रदक्षिणा घातली. त्यानंतर स्वतःभोवती एक गिरकी घेऊन ते ब्रह्मदेवासमोर उभे ठाकले. त्यांनी लगेच अहिल्येची मागणी केली. आपल्या बुद्धिचातुर्याने शास्त्रार्थ विशद करून अर्धप्रसूत गाईस प्रदक्षिणा घालणाऱ्याला पृथ्वीप्रदक्षिणेचं पुण्य लाभतं, तसंच सगळं विश्व आपल्यातच सामावलेलं असल्यामुळे स्वतःभोवती गिरकी घेऊन विश्वप्रदक्षिणा पार पडते, हे त्यांनी सभामंडपातील सर्वांना पटवून दिलं. ब्रह्मदेवांनी ते मान्य करून अहिल्येचा गौतमाशी विवाह लावून दिला. त्यानंतर लवकरच धावपळ करत इंद्रदेव सभामंडपात इतर सर्वांच्या आधी पोचले; पण येताच अहिल्या गौतमांशी विवाहबद्ध झाल्याचे पाहून ते संतप्त झाले. ‘कपटाने का होईना, मी अहिल्या मिळवीनच’, असा निश्चय त्यांनी केला.

पुढे एके दिवशी गौतम ऋषी स्नानसंध्या करण्यासाठी नदीवर गेले असता इंद्राने गौतमवेशात त्यांच्या आश्रमात जाऊन अहिल्येशी जारकर्म केले. गुपचूप चोरपावलांनी इंद्रदेव आश्रमाबाहेर पडत असताना गौतमांनी पाहिले आणि परिस्थितीची जाणीव होताच त्यांना शाप दिला की ‘तुझ्या शरीराला सहस्र भगे पडतील आणि तू विद्रूप कुष्ठरोगी होशील.’ नकळत अहिल्येनेही हे पाप केल्याने तिलाही ‘तू शिळा होऊन पडशील’ असा शाप त्यांनी दिला.

कुष्ठाने पीडित इंद्र लज्जित झाल्यामुळे देवलोकांत गेला नाही. देवांच्या राजाची ही अवस्था पाहून देवगुरू बृहस्पती इंद्राला घेऊन गौतमाकडे गेले आणि त्यांची क्षमा मागितली. गौतमांनी उःशाप दिला की 'कदंबनगरीत जाऊन गणेशाच्या षडाक्षरी मंत्राचा जप कर.' त्याप्रमाणे भगांकित इंद्राने बारा वर्षे कदंब वृक्षाखाली बसून तपश्चर्या केली. भगवान श्री गणेश प्रसन्न झाले. त्यांनी अंकुशाने त्या ठिकाणी एक कुंड निर्माण केले व स्वर्गीची गंगा त्या कुंडात प्रवाहित केली. त्या गंगाजलाने स्नान केल्यावर इंद्राची त्वचा पूर्ववत सुकुमार नितळ झाली. त्याचे शरीर अधिक तेजःपुंज झाले पुन्हा स्वर्गातील देवाधिदेव म्हणून त्याला मान्यता मिळाली.

ज्याच्या कृपेने इंद्राला पूर्वपद लाभले, त्याच्या स्फटिकवत् अंगुष्ठमात्र मूर्तीची स्थापना इंद्राने तपश्चर्येच्या जागीच केली, तीच ही गणेशमूर्ती - श्री चिंतामणी. भक्तांच्या चित्तातील इच्छा पूर्ण करणारा - श्री गजानन. त्याची स्थापना अशी प्राचीन काळात झालेली आहे. नंतरच्या काळात भाविक भक्तांनी चढवलेल्या शेंदूरलेपनामुळे मूळ मूर्तीचे स्वरूप बदलले; परंतु ती मूळ मूर्ती स्फटिकवत आणि अंगुष्ठमात्र होती, हे फक्त पुराणातील कथेतूनच कळतं.

यवतमाळपासून नागपूरच्या दिशेने राज्य महामार्ग क्रमांक 7 अ वर बावीस किलोमीटर अंतरावर कळंब आहे. कळंबच्या आजूबाजूला डोंगराचा परिसर आहे. चक्रावती या नदीच्या काठावर कळंब गाव वसले आहे. दत्तनाला आणि चक्रावतीचा संगम येथे झाला आहे. कळंब बसस्टँडवरून उत्तर दिशेला सुमारे एक फर्लांग अंतरावर हे मंदिर आहे. जमीन सपाटीपासून सुमारे पस्तीस फूट खोल जागेत हे मंदिर असल्यामुळे दुरून कळसही दिसत नाही. जवळ पोचल्यावर रस्त्यावर उभे राहिले असता मंदिराच्या प्रवेशद्वाराऐवजी कळस दिसतो. मंदिराचा संपूर्ण परिसर बाहेरून

शिवपिंडीप्रमाणे भासतो. तत्कालीन शिल्पकारांनी ही रचना अत्यंत कल्पकतेने केली असावी.

मंदिरात प्रवेशासाठी तसे तीन मार्ग आहेत. मंदिराच्या मुख्य प्रवेशद्वारातून आत शिरल्यावर समोरच चतुर्मुखी गणेशमूर्ती दिसते. एकाच दगडात चारही दिशेला गणेशमुखे असून त्यांचे हात एकमेकांत मिसळलेले आहेत. ही मूर्ती गावाच्या उत्तरेकडे प्राचीन गढीत खोदकाम करताना सापडली होती. या मूर्तीच्या पुढ्यात भव्य सभामंडप आहे. त्याची निर्मिती स्व. नारायणराव राजहंस उर्फ बालगंधर्वांनी केली आहे. यवतमाळ येथे त्या काळात झालेल्या त्यांच्या एका कार्यक्रमाचे सगळे उत्पन्न त्यांनी या मंदिरास दिले. त्यांचे औदार्य पाहून भगवान भिकू नावाच्या गवंड्याने कुठलाही मोबदला न घेता हा सभामंडप बालगंधर्वांच्या देणगीतून बांधून दिला. मंदिरात उतरण्याच्या पहिल्याच पायरीवर संगमरवरी फरशी बसवलेली होती. त्यावर सौ. जनाबाई मा. मांडवकर (लेखकाच्या आजी) यांनी मंदिरास 30-7-1957 रोजी 301 रुपयांची देणगी दिल्याचे कोरले आहे. सर्व भक्ताचे पाय त्यावर पडत असल्याने ती सध्या प्रवेशद्वाराजवळ डावीकडे भिंतीवर बसवली आहे.

प्रवेशद्वारातून आत डाव्या बाजूला या चतुर्मुखी गणपतीपासून एकोणतीस पायऱ्या उतरल्यावर समोर बाहेरून अष्टकोनी व आतून चौकोनी असे कुंड आहे. त्याला ‘श्री गणेश कुंड’ असे म्हणतात. इंद्र आणि अन्य असंख्य भक्तांचा कुष्ठरोग दूर करणारे हे महातीर्थ असलेले कुंड. हे कुंड म्हणजे एकप्रकारची निमुळती विहीरच आहे. गणेशकुंडासमोरील गाभाऱ्यात श्री चिंतामणीची मूर्ती आहे. दक्षिणाभिमुख  असलेली ही गणेशमूर्ती भारतातच नव्हे तर जगातही एकमेव असावी, असे काही अभ्यासक म्हणतात. कदाचित इंद्रदेव तपश्चर्येला उत्तरेकडे तोंड करून बसले असावे, त्यांच्यासमोर श्रीगणेश प्रगटले असावे, म्हणून गणेशमूर्तीचे

तोंड दक्षिणेकडे असावे. या मूर्तीला चार हात, गजमुख आणि शूर्पकर्ण आहेत. या गणेश मूर्तीच्या दोन्ही बाजूला दोन स्वतंत्र ओवऱ्यांत शंकराच्या पिंडी आहेत. शिवाय नग्नभैरव शिवपिंडही आहे. देवी गायत्री तसेच विठ्ठल रुक्मिणीच्या मूर्तीही येथे गणेशमूर्तीच्या पुढ्यात दर्शनार्थींच्या डाव्या हाताला आहेत. बालगणेशाच्या दोन मूर्तीही आहेत. चिंतामणी मंदिरातील नंदादीप अखंड तेवत असतो.

सिंदूरलेपनामुळे वाढलेल्या आकारात ही मूर्ती सुमारे चार फूट उंच आणि तितकीच रूंद होत चालली होती. 1 फेब्रुवारी, 1998 रोजी श्रीगणेश जयंतीला (चतुर्थी) चिंतामणी मूर्तीची खोळ सुटू लागली. माघ शुद्ध पंचमीला मूर्तीची खोळ पडू लागल्याचे भाविकांच्या लक्षात आले; परंतु दुसऱ्याच दिवशी षष्ठीला काला व्हायचा असल्याने आणि विनायकी चतुर्थीपासून दर्शनार्थींची यात्रेनिमित्त गर्दी असल्यामुळे मूर्तीभोवती खोळ बांधून ठेवण्यात आली होती. षष्ठीची यात्रा संपल्यानंतर सप्तमीला वेडीवाकडी झालेली खोळ निघेल तेवढी काढून घेण्यात आली. त्यानंतर एकशे एक सुवासिनींच्या हस्ते कलशस्नान घालून पुन्हा सर्व शास्त्रोक्त विधी करून चिंतामणीला शेंदूराचे पुनर्लेपन केले गेले. खोळ काढल्यानंतरची मूर्ती आधीच्या मूर्तीच्या तुलनेत जवळपास निम्म्या आकाराची दिसू लागली होती. तत्पूर्वी चिंतामणीची खोळ केव्हा पडली याची माहिती उपलब्ध नाही; परंतु किमान सव्वाशे वर्षांत ती पडली नसावी, असे वयोवृद्ध नागरिकांच्या मतांवरून लक्षात येते.

पुराणांतील वर्णनावरून श्री चिंतामणीची मूर्ती स्फटिकासारखी शुभ्र होती. पुढे ती शेंदूरलेपनाने शेंदरी वर्णाची झाली असावी किंवा परचक्राच्या वेळी मूळ मूर्ती लपवून दुसरीकडे लपवून ठेवण्यात आली असावी, असेही म्हटले जाते.

मंदिरातच श्री चिंतामणी मूर्तीच्या उत्तरेला सिमेंटविटांनी व्यवस्थित बांधून काढलेले जे गणेशकुंड आहे, ते इंद्राच्या काळातील असावे, अशी श्रद्धा ठेवून भक्त ह्या गणेशकुंडातील पाणी गंगेचे तीर्थ म्हणून प्राशन करतात. गणपतीच्या पादप्रक्षालनार्थ बहुतेक दर बारा वर्षांनी गंगा येते, असा भक्तजनांचा समज आहे. गंगास्नानाने सर्व पापे धुतली जातात, असा समज आहे. सर्वांची पापं धुणारी गंगा माता स्वतःही पापसंपृक्त होते आणि नाइलाजाने ज्या चिंतामणीच्या कृपेने इंद्राची पापे धुतली गेली, त्या चिंतामणीलाच स्पर्श करून स्वतः पापमुक्त होते. आज ह्या कुंडावर काचेचे झाकण लावलेले आहे, जेणेकरून भक्तांनी त्यात फुले, पैसे टाकून पाणी दूषित होऊ नये. तरीही काही भक्त प्रदूषणाचा विचार न करता ते झाकण बाजूला करून त्यात फुले, पैसे टाकण्याचा प्रयत्न करतातच.

गणेशाच्या पूजेसाठी इंद्राने ही गंगा आणली होती, असे भक्त मानतात. गौतम ऋषींच्या शापातून मुक्त झाल्यावर चिंतामणी देवतेची स्थापना जेव्हा इंद्राने केली, तेव्हा चिंतामणीपूजनासाठी पृथ्वीवरील पाणी कसे वापरावे, हा प्रश्न पडल्याने इंद्राने स्वर्गातूनच श्री गंगेला आवाहन केले आणि पूजनानंतर तिला दर बारा वर्षानंतर श्री चिंतामणीला स्नान घालण्याची आज्ञा केली, अशी आख्यायिका आहे.

ही गंगा आली की पाण्याची पातळी वाढू लागते. कुंडातून पाणी झिरपू लागते. काही दिवसांतच या पाण्याचा स्पर्श चिंतामणी मूर्तीला झाला की पाणी ओसरू लागते असे सांगतात. आतापर्यंत 1918, 1933, 1948, 1958, 1970, 1883, 1995 या वर्षांत गंगा आली होती. यावरून तंतोतंत बारा वर्षांनी गंगा अवतरत नाही, असे लक्षात येते. मात्र आपण मंदिरात उतरतो, त्याहीपेक्षा खोल असणारी ही विहीर दरवर्षीच्या पावसाने तुडुंब भरून वाहत

का नाही, हे कोडेच आहे. काही काळ यवतमाळ येथे पोलीस अधिकारी म्हणून राहिलेले भूगर्भशास्त्रात पी.एचडी. असलेले दिल्लीचे डॉ. बिसारिया तसेच जिल्हाधिकारी राहिलेले श्री. गिरिराज यांनीही याचा अभ्यास करण्याचा प्रयत्न केला होता.

1995 मध्ये सप्टेंबर महिन्यात अवतरलेल्या या गंगेची दूरदुरून आलेल्या भाविकांनी पूजा केली व तीर्थ नेले. नोटांची पुडकी, सोने, नाणी, फुले गंगेला अर्पण केली. सुमारे वीस-बावीस दिवस चिंतामणी मंदिरातील चौकात पाणी होते. मोटर लावून पाणी उपसले तरी लगेच ते पाझरून येई. भाविकांच्या पूजेची फुले, पाने, नारळ, दुर्वा यांमुळे पाणी दूषित होऊन जनतेला त्रास होऊ नये, त्यासाठी ते सारखे उपसावे लागे.

गणेशमूर्तीसमोर जे गणेशकुंड आहे, ते भूपातळीपासून सुमारे 35 फूट खोल आहे. या मंदिराच्या आवारातच पूर्वेकडे एक विहीर आहे. तिची खोली सुमारे 35 फूट आहे. तिला नेहमीच पाणी असते. या परिसराचे अवलोकन केले असता हे मंदिर पूर्वी सरोवरावर बांधले असावे, असे वाटते.

परंपरेने पुजारी म्हणून व्यास घराण्यातील ब्राम्हण आतापर्यंत पूजा करीत होते. गेल्या काही वर्षांपासून वेतनावर पुजारी नियुक्त करण्यात आले आहेत. कळंब मधील बऱ्याच स्त्रिया, पुरुष आणि विद्‌यार्थी रोज सकाळी चिंतामणीचे दर्शन घेऊन दिनचर्येला लागतात. रोजच्या सुप्रभाती दर्शनाने मनःशांती मिळते, असे भाविक सांगतात. दर महिन्याच्या संकष्टी चतुर्थीला व अंगारकी चतुर्थीला दूरदूरच्या गावाहून, पुण्यामुंबईहूनही काही भाविक चिंतामणीच्या दर्शनासाठी येतात. अनेक भाविक 22 किलोमीटर अंतरावरील यवतमाळसारख्या शहरांतून चतुर्थीच्या आधल्या रात्रीच पायी निघून पहाटे कळंबला पोचून दर्शन घेतात. यवतमाळ-कळंब मार्गावर रात्री भक्तांसाठी पाणी, चहा, नाश्ता

देणारी काही श्रीमंत भाविक मंडळी आहेत, त्यात चिंतामणी ट्रॅव्हल्सचे श्री. जैसवाल यांचाही समावेश आहे. अशा या चहापाण्याच्या सोयीमुळे पूर्वी घनदाट जंगलाचा व घाटाचा असलेला आणि आज केवळ सामान्य जंगलाचा, काही गावांना स्पर्श करून जाणारा घाटविरहित झालेला महामार्ग खडतर न राहता भक्तांसाठी काहीसा सुखकर झाला आहे.

या मंदिरात कोणीही जबरदस्तीने दक्षिणा किंवा पैसे मागत नाही. परिसरातल्या किरकोळ भिकाऱ्यांचा त्रास सोडला तर बाकी येथे कुठलाही त्रास होत नाही. शक्यतो या मंदिरात खूप गर्दी नसते; पण चतुर्थी किंवा सणासुदींना गर्दी होते. अशा वेळी किलोमीटरभर रांगाही लागतात. मंदिर खोल असून गाभाऱ्याचा मार्ग फार अरुंद आहे. द्वारातून वाकून जावे लागते. तिथे जागा फार कमी असल्याने दर्शनाला तिथे फार लोकांना थांबता येत नाही. ते दर्शन घेऊन पुढे निघाल्यावरच त्यांच्या मागील भक्तांना आत जाता येते. गर्दीत तिथे मोकळी हवा येत नाही. अनेक मंदिरांचा जिर्णोद्धार होतो. याही मंदिराचा जिर्णोद्धार झाल्यास मूळ ढाचा न बदलता दुरून दर्शन घेता येईल व गाभाऱ्यातील गर्दी टाळता येईल, यादृष्टीने समोरच्या प्रवेशाच्या द्वाराचा भाग काढल्यास ही समस्या सुटू शकते. आजकाल त्वरित दर्शन होणाऱ्या व प्रसन्न, मोकळ्या वातावरणातील देवस्थानांना जाणाऱ्या भाविकांमध्ये कमालीची वाढ झाली आहे. त्यामुळे मंदिराचे उत्पन्नही वाढते. अनेक सेवा योजना राबवता येतात. तेव्हा कळंबच्या चिंतामणीला येणाऱ्या भाविकांना दर्शनासाठी फार काळ तिष्ठत राहावे लागू नये, यासाठी उपाययोजना करण्याची नितांत आवश्यकता आहे.

येथे कार्यक्रमासाठी, विवाहासाठी हॉल आहे. राहण्याची सोय आहे. स्वच्छतागृहे आहेत. पाण्याची सोय आहे.

भोजनप्रसादाची सोय आहे. अनेक दात्यांना येथे त्यांच्यातर्फे भोजन देण्यासाठीही व्यवस्था आहे. देवस्थानाकडून अगदी भांड्यांपासून सर्व साहित्य मिळते. अवेळी येणाऱ्या भक्तांच्या भोजनप्रसादाची सोय न झाल्यास कळंब-नागपूर किंवा कळंब-यवतमाळ रोडवर धाबेही आहेत आणि यवतमाळसारखे शहर अगदी 22 किलोमीटरवर असल्याने व या नागपूर-तुळजापूर मार्गावर रात्रभर नागपूर-नांदेडसारख्या बसेस चालत असल्याने भक्तांना अडचण जात नाही.

## अन्यत्र श्री चिंतामणी कथासाम्य

जसे यवतमाळ जिल्ह्यातील कळंबबद्दल सांगितले जाते, तसेच उस्मानाबादमधील कळंबबद्दलही सांगितले जाते. तेथेही कळंबची प्रतिकृती वाटावी, असे चिंतामणी मंदिर आहे.

भारताच्या दक्षिण टोकावरील कन्याकुमारी मंदिरापुढे कळंबच्या मूर्तीप्रमाणे गणेशमूर्ती असून जवळच्या खोलगट भागातील मंदिराला व तेथल्या गणपतीला अनुलक्षून नेमकी अहिल्या, इंद्र, गौतम व चिंतामणी गणेशाची कथा प्रचलित आहे. कुष्ठपीडित इंद्राने त्या स्थळी गणपतीला तपोबलाने प्रसन्न केले, असे येथेही सांगितले जाते.

पुण्याजवळील थेऊर येथे जी चिंतामणीची कथा सांगितली जाते, त्या कथेतही कळंबच्या चिंतामणी कथेशी साम्य आढळते.

कळंबच्या चिंतामणी मंदिरातील पायऱ्या उतरण्यापूर्वी दिसणारी चतुर्मुखी मूर्ती कळंबच्या गढीत सापडली होती. सुमारे पाऊणशे वर्षांपूर्वी ती येथे आणून मांडली गेली. अशीच गणेशमूर्ती यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर येथे आणि कन्याकुमारीलाही आहे.

# कळंब तालुक्याची आकडेवारी

**(कालपरत्वे बदल संभवतो.)**

कळंब तालुक्याचे क्षेत्रफळ 74,902.83 हेक्टर असून लोकसंख्या 127,750 (2021) आहे. कळंब शहराची लोकसंख्या 17447 आहे. तालुक्यात एकूण गावे 142 तर ग्रामपंचायती 61 आहेत. पोलीस ठाणे एक असून ते कळंब या मुख्यालयी आहे. महसूल मंडळे 6, जि.प. सर्कल 3, प्राथमिक आरोग्य केंद्रे 6 तर एक ग्रामीण रुग्णालय आहे. पशुधन 55210 आहे. शिक्षणाच्या बाबतीत 118 शाळा असून अंगणवाड्या 128 आहेत. तालुक्यात 11 कनिष्ठ महाविद्यालये आहेत. कला, वाणिज्य व विज्ञान शाखा असणारे व एम.ए., एम.कॉम.पर्यंत शिक्षण देणारे एकमेव इंदिरा महाविद्यालय येथे आहे. शिवाय एक विज्ञान, एक बीसीए, बीबीए चे अभ्यासक्रम चालविणारे महाविद्यालय, एक आयटीआय, एक शारीरिक शिक्षण, एक शिक्षण, एक औषधनिर्माण शास्त्र महाविद्यालय, एक कृषी विद्यालय तर डीएड प्रशिक्षण देणाऱ्या तीन संस्था आहेत. कळंब तालुक्यात बोरी महाल येथे 'अ' दर्जाचे सार्वजनिक वाचनालयही आहे. ही आकडेवारी अंतिम नसून कालपरत्वे बदलत असते.

# कळंबचा इतिहास

जसे श्री क्षेत्र चिंतामणीचे धार्मिक आणि पौराणिक महत्त्व आहे, तसेच कळंब या गावाला इतिहासही आहे. इ.स. 250 ते 510 या काळात कळंब परिसरात वाकाटकांचे राज्य होते. कळंब हे तेव्हा प्रमुख ठाणे होते. येथे काही काळ यादवांचीही सत्ता होती. सध्याच्या गढीची बांधणी यादवकालीन आहे. एका खोदकामात

यादवकालीन सोन्याची नाणी मिळाली होती. ती नागपूरच्या वस्तूसंग्रहालयात आहे.

तेराव्या शतकात बहामनी आणि इस्लामच्या आक्रमणाचे व गोंडांनी दिलेल्या झुंजीचे दाखले मिळतात. कळंब आणि माहूर ही दोन्ही गडस्थाने प्रतिकारार्थ झटली आणि ही दोनच ठिकाणे घेण्याचा शत्रूचा प्रयत्न झाला. येथे चांद्याच्या गोंड राजांची सत्ताही होती. परकीयांशी लढताना हजारो गोंड व अन्य आदिवासींनी येथे बलिदान दिले. 'जय ठाकरी' या नावाने ती स्मृती आजही गोंड आदिवासींमध्ये कथादिकांच्या दृष्टीने प्रचलित आहे. तो एक उत्सव आजही त्यांच्यामध्ये सुरू आहे. गोडांचा एक राजा बाबजीबुवा कळंब येथे मरण पावला. त्याची समाधी नदीकाठी बांधली आहे. कळंबच्या हजारो साधूंनी शत्रूशी लढा दिल्याच्या नोंदीही आढळतात.

औरंगजेबाच्या काळात चांदबिबीची सत्ता येथे होती. त्यापूर्वीच्या कालखंडातील 'आईने अकबरी'त कळंब परिसरात हिऱ्यांच्या खाणी होत्या, इसवीसन 1428 मध्ये सुलतान वलीशहाने आक्रमण करून हिऱ्यांच्या खाणीवर कब्जा मिळवल्याची नोंद आहे. अकबराच्या काळात 'सरकार' म्हणजे जिल्हे पाडण्यात आले. अशा तेरा जिल्ह्यांपैकी कळंब हा एक जिल्हा होता. या जिल्ह्यात एकोणवीस रेव्हेन्यू सर्कल्स म्हणजे महसुली ठाणी होती. दक्षिणेकडे माहूर, उत्तरेकडे पवनार, पश्चिमेकडे वाशिम हे जिल्हे कळंब जिल्ह्याच्या सीमाभागी होते. आजच्या यवतमाळ जिल्ह्याचा बराचसा भाग तेव्हा कळंब जिल्ह्यात अंतुर्भूत होता.

इ.स. 1599 मध्ये अहमदनगरचा बुऱ्हाण निजामशहा याची कारकीर्द येथे होती, असे एका रोहिल्याच्या घरात खोदकाम करताना सापडलेल्या चिऱ्यावरील मजकुरावरून लक्षात येते. त्यावर लेख कोरला आहे -

'दर जमाने हजरती बुऱ्हाण निजास्यासु ।

अलफ वाट सालवड डावी नाचण गावू ।।'

बुऱ्हाण निजामशहाच्या कारकिर्दीत जे लष्कर येथे आले होते, त्या लष्कराला किंवा वाटसरूंना वाट दाखवण्याकरिता अथवा सोयीसाठी जेथे सालोडफकीर (सध्याचे विजयगोपाल) आणि नाचणगावसाठी रस्ता फुटतो, तेथे हा चिरा बसवला असावा. त्यावरचा मजकूर फारशीत असून खाली अर्धा भाग बाळबोध लिपीत आहे. तो नीट वाचता येत नाही. हा चिरा आता नागपूरच्या संग्रहालयात आहे.

औरंगजेबाच्या मृत्यूनंतर मराठ्यांचे राज्य या भागात आले. शाहूराजाने ते वाढविले. परसोजी भोसले यांनी आपले वर्चस्व वाढवून गाविलगड, नर्नाळा, खेरडा, माहूर व कळंब या गडभागाच्या परिसरात आपली सत्ता प्रस्थापित केली. भोसले जेव्हा पश्चिम दिशेने विदर्भाकडे आले, तेव्हा यवतमाळच्या दक्षिणेकडील भांब येथील गढीवर व नंतर कळंब येथे थांबल्याचे दिसते. रघुजी भोसले नामक राजाने कळंबवर राज्य केले, अशी कथा सांगितली जाते. रघुजीच्या मुलीने लग्नाच्या आंदणात मागितलेल्या गावांत कळंबचा समावेश केलेला बापाला आवडला नाही. राजाने तिच्या तोंडावर हात ठेवून चूप केले, अशी काव्यमय रचना एका कथेत आहे.

इंग्रज येण्यापूर्वी कळंबवर निजामी राजवट होती. इ.स. 1849 मध्ये नागपूरकर भोसल्यांनी कळंब परिसरातील टेकड्यांच्या आश्रयाने चार हजार सैनिकांसह इंग्रजांना झुलवले होते, प्रखर लढा दिला होता. इ.स. 1857 च्या बंडाच्या वेळीही कळंब विभाग सक्रिय होता, याचे पुरावे सापडतात. देशभक्त राजगुरू येथेच भूमिगत होते, असेही इतिहासात नमूद केले आहे. राजगुरूंनी येथील चिंतामणी मंदिरातच गुप्त बैठक घेतली होती.

कळंब परिसराचा आणखी एक प्राचीन पुरावा म्हणजे अमरावती जिल्ह्यातील ऋद्धिपूर येथे सापडलेला ताम्रपट होय. हा ताम्रपट वाकाटककालीन आहे.

गोंड, परधान, आंध, माना, गोवारी, हलबी आदी आदिवासींचे वैपुल्य असलेला हा भूभाग आदिवासी राजांच्या ताब्यात होता. कळंबचा चिंतामणीच नव्हे तर मूळातच गणपती हा प्रथम आदिवासींची व ग्रामीणांची देवता मानली जाते. तेव्हा आदिवासीबहूल कळंब येथे श्री गणेशाचे मंदिर असणे आश्चर्य म्हणता येणार नाही. पूर्वी श्री चिंतामणी मंदिराची देखभाल आदिवासींनी केली असावी.

# कदंबनगरी आणि परिसर

कळंब नावाची महाराष्ट्रात सात गावे आढळतात. त्यापैकी पुणे, उस्मानाबाद आणि यवतमाळ जिह्यातील कळंब हे तालुके लोकसंख्या, विकास आणि इतिहास या दृष्टीने प्रसिद्ध आहेत. यवतमाळ जिल्ह्यातील कळंब हे चिंतामणी मंदिरामुळेच जगप्रसिद्ध झाले आहे. कळंब नावाचे दुसरे गाव विदर्भात नाही.

कळंब परिसरात कळंबाच्या (कदंबाच्या) झाडांचे वैपुल्य होते व आजही ही झाडे येथील वनाडोंगरात बऱ्याच प्रमाणात आहेत.

कळंब हे पूर्वी पंचायत समितीचे मुख्यालय होते. आता तालुका आहे; पण वर उल्लेख केल्याप्रमाणे फार पूर्वी हा जिल्हा असावा, असे पुरावे आजही आढळतात.

पारधी, गोंड, गोवारी, आंध, माना, हलबा, कोष्टी अशा अनेक जमाती या परिसरात राहतात; पण कोलाम जमात या

परिसरात जास्त प्रमाणात आढळते. कोलामांचे 31 पोड या भागात आढळतात.

चिंतामणी मंदिराच्या बाहेर रस्ता ओलांडून पश्चिमेला दोन मंदिरे आहेत. त्यापैकी एकात दत्तमूर्ती आणि पादुका आहेत. या मूर्तीची स्थापना श्री. देवराजजी धोबे पाटील व काही भक्तांनी 1994 मध्ये केली. दुसऱ्या मंदिरात अनसूयेची मूर्ती आहे, असे भक्त मानतात. ह्या मूर्तीच्या गळ्यात काळ्याशार रुद्राक्षांची माळ, वरील डाव्या हातात विनायकाची मूर्ती आणि खालील डाव्या हातात कमंडलू, मस्तकावर मुकूट आणि दोन बाजूला दोन दासी उभ्या आहेत. पूर्वी येथे पार्वतीची मूर्ती होती. ती 1990 मध्ये चोरीला गेली. त्या ठिकाणी ही मूर्ती स्थापित केली गेली.

चौदा चावड्यांचे, बत्तीस महालांचे आणि बारा मारुतींचे कळंब असा लौकिक या गावाचा आहे. आजच्या घडीला अशा चावड्या, महाल राहिलेले नाहीत. कळंबच्या पूर्वेला चार किलोमीटर अंतरावर बोरी महाल नावाचे खेडे आहे. तिथे गढीही आहे. कदाचित प्राचीन काळी कळंबच्या बत्तीसपैकी तो एक महाल असावा. एकेकाळच्या कळंब सरकारच्या म्हणजे कळंब जिल्ह्याच्या कक्षेत चौदा महसुली किंवा त्यासारखे प्रमुख विभाग असावेत. त्यावेळच्या रचनेप्रमाणे त्या जिल्ह्यात बत्तीस महालही असावेत. तहसिलीला महाल म्हटले जात असावे. त्यातीलच एक बोरी महाल असावे.

बारा मारोतींच्या बाबतीत उल्लेख सार्थ वाटतो. येथील परिसरात आजही मारुतीची बारा मंदिरे आढळतात. यांपैकी तळ्याचा मारुती पूर्वेला, राठचा मारुती पश्चिमेला, जोंधळणीचा मारुती दक्षिणेला तर मुदापूरचा मारुती कळंबच्या उत्तरेला आहे. शिवाय आठ दिशांच्या आठ मारुतींनी या गावच्या शिवेचे रक्षण केले आहे, असे श्रद्धाळू सांगतात.

कळंबच्या पूर्वेला दोन किलोमीटर अंतरावर एका पुष्करणीकाठी कलावंतीणीचा महाल होता, अशी नोंद इ.स. 1507 च्या एका फारशी शिलालेखात आहे. हा शिलालेख त्या महालाच्या मूळ जागी अजूनही आहे, असे म्हणतात.

कळंबला नदीमध्ये एक कागदडोह होता. तेथे पूर्वी कागदांचा कारखाना होता. अकबरकालीन ही स्थिती असावी. कळंबला हिऱ्यांची खाण होती आणि येथे हिऱ्यांचा व्यापारही चालायचा, अशी प्रवाशी नोंद ‘आईने अकबरी’त आहे. घोंगडी, तढव विणण्याचा धंदा येथे बऱ्याच आधीपासून चालत होता. कळंब परिसरातील बांधकामातल्या विटा पाण्यावर तरंगायच्या असे सांगतात. येथून बाभूळगावमार्गे अमरावतीकडे जाताना लागणाऱ्या तळेगाव दशासरच्या विटाही पाण्यावर तरंगतात, असे म्हणतात. तळेगाव दशासर येथील एका मंदिरात कळंबहून रघुजी भोसले यांनी पाठवलेली काही दानपत्रे अथवा आज्ञापत्रे आहेत, असे सांगतात. कळंब येथे बैल आणि तरुणांच्या कुस्त्यांची दंगल भरविली जायची. या लढायांच्या जागांच्या खुणा आजही काही प्रमाणात आढळतात. कळंब येथे भरणारा बैलबाजार आजही प्रसिद्ध आहे.

कळंबला यादवांच्या नंतर केव्हातरी गवळी लोकांची संस्कृती प्रभावी होती, असे वाटते. त्यानंतर रजपूत आणि मराठे भटकंतीत इकडे आले व त्यांनी गोपसंस्कृती मागे टाकली. भटकत आलेले कुणी एक ठाकूर कळंबचे सत्ताधारी झाले. पुढे ते ‘ठाकरे’ नावाचे ग्रामाधिकारी ठरले.

कळंब हे ऐतिहासिक गाव पूर्वी मंदिरमूर्त्यांनी व्यापलेले होते. एक धर्मकेंद्र होते. चक्रावती नदीच्या दोन्ही किनाऱ्यांवर अनेक मंदिरे होती. आजचे श्री चिंतामणी मंदिर पुरातन काळी गावापासून दूर वनराईत, कदंबराजीत सरोवराकाठी होते. हा सर्व

परिसर हिंदूंनी व्यापलेला असावा. जवळच असलेल्या तपेश्वरमंदिरातील मूर्ती जुन्या काळच्या असून त्या इ.स. 700 ते 1100 च्या दरम्यानच्या असाव्या.

श्री क्षेत्र चिंतामणीपासून सुमारे सात किलोमीटरवर द्रुग किंवा दुर्गचा किल्ला आहे. आता तो खंडहर अवस्थेत दिसतो. पाचव्या शतकातील एका ताम्रपटाच्या उल्लेखावरून हे स्पष्ट होते की, कळंबजवळील कदंबगिरीग्राम दानात दिलेले गाव होते. याच गावाला आज 'दुर्ग' म्हणतात. येथे तेव्हा अभेद्य डोंगरी किल्ला होता. तो गोंडांनी किंवा तत्पूर्वी उभारला व जोपासला असावा.

मध्यंतरी खोदकामात या किल्ल्यातही यादवकालीन सोन्याची नाणी सापडली व ती आज नागपूरच्या वस्तूसंग्रहालयात आहेत. द्रुग किल्ल्याचा परिसर अतिशय निसर्गरम्य आणि दाट झाडीने व्यापलेला आहे. किल्ल्यावर श्री रेणुकादेवीचे मंदिर आहे. जवळच पायथ्याशी एक तलाव आहे. या भागात आणि कळंबच्या गढीच्या खोदकामात तांब्याचीही नाणी सापडायची. संशोधकांच्या मते ती गुप्तकालीन होत. आजही अनेक अंधश्रद्धाळू किंवा लोभी या खंडहर झालेल्या किल्ल्यात पुरातन खजिने सापडतील या आशेने लपूनछपून खोदकाम करतात. काही तर पायाळू व्यक्तींना आणून त्यांच्या तर्कशक्तीने असे शोध घेत हे कृत्य करताना दिसतात.

द्रुगच्या किल्ल्याचा दगड, चिंतामणी मंदिराचा दगड आणि जवळच असलेल्या नांझा या गावातील वाड्यांच्या बांधकामात वापरण्यात आलेले दगड हे सारखेच आहेत. कळंबची गढी, दुर्गचा किल्ला, चिंतामणी मंदिर आदी शिल्पांची बांधणी पुरातन किंवा यादवकालीन असली, तरी उस्तवारी, डागडुजी, पुनर्बांधणी हे कळंब सरकारच्या माध्यमातून गोंड, भोसले आणि मोगल सत्ताधाऱ्यांनी केल्याचे लक्षात येते.

कळंब हे आज तालुक्याचे ठिकाण आहे. मात्र पूर्वी ते मोठे शहर असावे व तीन किलोमीटरवरील बोरी महालपर्यंत याचा विस्तार असावा असे वाटते. कळंब आणि बोरी महाल येथील संपन्नता सहज लक्षात येते. अनेक गढी आणि त्या गढींची पांढरी माती त्याचेच द्योतक आहे. काही वृक्ष मोठमोठाले असून त्यांच्या सभोवतालच्या वस्तीवरूनही प्राचीनता लक्षात येते. पूर्वी गढींच्या भिंतींमध्ये लपविले जाणारे धन सापडेल या आशेने गढीची माती उकरणारेही अनेक महाभाग आढळतात. त्यात काही अपघात होऊन गढीची भिंत अंगावर कोसळल्याने काही अपघातही झालेले आहेत.

कळंबजवळचे रमणीय ठिकाण म्हणजे श्री क्षेत्र चिंतामणीपासून पाच किलोमीटरवर उंच टेकडीवर असलेले दत्ताचे स्थान - निरंजन माहूर. हे दत्त भक्तांचे श्रद्धास्नान. नांदेड जिल्ह्यातील यवतमाळपासून 82 किलोमीटरवर असलेले दत्ताचे वास्तव्य असलेले ठिकाण म्हणजे मोठे माहूर तर कळंबजवळील हे ठिकाण म्हणजे निरंजन माहूर. अरण्याचा प्रदेश आणि जवळच तलाव असल्याने पुढाऱ्यांनी मनात आणले तर या स्थळाला पर्यटनस्थळ म्हणून दर्जा मिळण्याची शक्यता आहे. श्री दत्तमूर्तीच्या मस्तकावर आशीर्वादात्मक हस्त ठेवून उभी असलेली अनसूयेची मूर्ती हे येथील खास आकर्षण. काळ्या पाषाणात कोरलेली ही रेखीव मूर्ती शिल्पकलेचा एक उत्कृष्ट नमुना आहे. दत्तजन्माच्या वेगवेगळ्या कथा येथे ऐकायला मिळतात.

कळंबपासून सुमारे 20 किलोमीटरवर राळेगाव आहे. या शहराच्या दक्षिणेस तीन किलोमीटरवर रावेरी किंवा रामगंगा हे पौराणिक गाव आहे. हा रामायणकालीन दंडकारण्याचा भाग आहे, असे सांगितले जाते. येथे नदीशेजारी जगतजननी सीतामातेचे (जनकनंदिनी) जे पुरातन मंदिर आहे, त्याची कथा अशी सांगितली जाते - परिटाने व्यक्त केलेल्या संशयावरून जेव्हा सीतेचा रामाने

त्याग केला, तेव्हा ती काही दिवस वाल्मिकींच्या आश्रमात वास्तव्याला होती, तो आश्रम येथे होता, असा समज आहे. येथेच लवकुशांनी रामाचा अश्वमेध यज्ञाचा घोडा अडवला व नंतर झालेले युद्धही या भूमीतच झाले, असे गावकरी सांगतात. जवळच्या रामगंगा नदीशेजारी असलेली समाधी वाल्मिकी ऋषींची असल्याचे बोलले जाते.

झोपलेला किंवा आडवा जो नऊ फुटाचा मारुती येथील मंदिरात आहे, त्याचे पाय दगडी साखळदंडाने बांधले आहेत. या मारुतीला बालपणी त्याच्या मातेने अशी शिक्षा केली होती. या मूर्तीवरून अंजनी मातेचा आश्रम येथे असावा, अशीही श्रद्धा आहे. काहींच्या मते तो लवकुशांशी लढताना जायबंदी झाला आहे. त्याचे प्रतीक म्हणून ही बंदिस्त हनुमानाची मूर्ती आहे.

मुलांना पेज हवी म्हणून सीता गावात गव्हाची भिक्षा मागण्यास गेली; परंतु तिला कुणीही गहू दिले नाहीत. तेव्हा सीतेने या गावात गहू पिकणार नाही, असा शाप दिला. आजही येथे गव्हाचे पीक आढळत नाही. तो पेरला तर पिकत नाही, असे सांगितले जाते.

भारतातील एकमेव सीता मंदिर असल्याचे जे बोलले जाते, ते काही अभ्यासकांना पटत नाही. हे मंदिर 16 व्या शतकात बांधण्यात आले असावे. मध्यंतरी या मंदिराची प्रचंड दुरवस्था झाली. ते कोसळण्याच्या बेतात आले. शेतकरी संघटनेच्या शरद जोशींनी याच रावेरी गावात 2001 मध्ये शेतकरी संघटनेच्या महिलांचे राष्ट्रीय अधिवेशन भरवले होते. पुढे त्यांनी आपल्या खासदार निधीतून येथे समाजमंदिर बांधून दिले व 10 लाखाचा निधी मंदिर बांधकामासाठी दिला. सरपंचांसह काही मंडळींनी आणखी प्रयत्न करून नांदेडच्या देगलूरहून शिळा आणल्या. लातूरचे कारागिर बोलावले व मंदिराची दुरुस्ती केली. शासनाने

रावेरीला ‘क’ वर्ग पर्यटनस्थळाचा दर्जा दिला. मात्र हवी तशी प्रगती झालेली दिसत नाही आणि हे मंदिरही खूपसे प्रसिद्धीच्या झोतात आले नाही.

कळंबपासून उत्तरेला 15 किलोमीटरवर उत्तराभिमुखी वर्धा नदीच्या किनाऱ्यावर कोटेश्वर संस्थान आहे. तिथे उंचावर महादेवाची पिंड आहे. येथे प्राचीन काळी कोट्यावधी यज्ञ झाले होते, असे सांगतात. आजही या भागात कुठेही खोदले तरी यज्ञातील राखेप्रमाणे माती मिळते. रक्षाविसर्जनासाठी व तत्सम विधींसाठी अनेक लोक येथे येतात. तसेच नदीपात्रात विशिष्ट ठिकाणी बिल्वपत्रे बुडतात म्हणून त्या ठिकाणाला बेलबुडी म्हणतात. या नदीत काही ठिकाणी पाण्यात खेचून घेणारे भवरे आहेत. म्हणून मृत्योपरान्त रक्षाविसर्जनासाठी येणारे महामार्गाच्या दिशेने हे विधी न करता सात किलोमीटरचा फेरा घेऊन पलीकडच्या तटावर हे विधी करतात. महामार्गाच्या दिशेने असलेल्या पात्रात भवऱ्यांनी होड्या किंवा माणसांना खेचून घेतल्याच्या काही घटना घडलेल्या आहेत.

याशिवाय खटेश्वर संस्थान, बोपापूरची देवी, नरसापूरचे महादेव मंदिर, तिरझड्याच्या टेकडीवरील जागृत गोसावी मंदिर ही प्रसिद्ध धार्मिक ठिकाणे आहेत. कळंबजवळच असलेल्या गलमगावचा मारुतीही प्रसिद्ध आहेत.

15 मे 1985 या दिवशी झोपडी बांधण्यासाठी खोदकाम करणाऱ्या नामदेव शांताराम नाईक यांना एक अतिशय सुंदर मूर्ती सापडली. नवीन विश्रामगृहाच्या बाजूला जुन्या स्मशानभूमीत जेमतेम साडेतीन फुट खोलीवर ही मूर्ती उपडी पडली होती. ती विष्णूची की देवीची याबद्दल लोकांना खात्री पटेना. नागपूर पत्रिकेत त्या वेळी ती अर्धनारीनटेश्वराची मूर्ती असावी, असे म्हटले होते. काही वर्षांपूर्वी हलबीपुऱ्यातही असेच एक शिल्प सापडले. ती

विष्णूची मूर्ती मानतात; परंतु डॉ. भाऊ मांडवकरांच्या मते ती अनंगाची म्हणजेच मदनाची मूर्ती आहे. यावरून प्राचीन कळंब हे मंदिरमूर्त्यांनी व्यापलेले गाव असावे, असे वाटते. चक्रावती नदीच्या किनाऱ्यावर पूर्वी अनेक मंदिरे असावीत. त्यातील बऱ्याचशा विलोभनीय मूर्ती आजही अधूनमधून सापडत असतात. येथील तपेश्वर मंदिरातल्या मूर्ती बऱ्याच जुन्या काळातील आहेत. पुण्यातील विद्वान इतिहास संशोधक कै. डॉ. प्र.ल. सासवडकर यांनी कळंब परिसरात सापडलेल्या बहुतेक मूर्ती इ.स. 700 ते 1100 या काळातील आहेत, असे सांगितले होते.

इतिहास संशोधक डॉ. प्र.ल. सासवडकर यांच्या मते श्री चिंतामणी मंदिराच्या समोरील रस्त्याच्या दुसऱ्या काठावर दत्तमूर्तीसह असलेले पूर्वाभिमुख मंदिर मूळात अनसूयेचे नसून ती मूर्ती अन्नपूर्णा पार्वतीची आहे. तिचे अवयव अत्यंत रेखीव असून ती सुमारे एक हजार वर्षांपूर्वीची पार्वतीची मूर्ती आहे, असे यवतमाळचे इतिहास संशोधक डॉ. य.खु. देशपांडे यांनीही लिहून ठेवले आहे.

कळंबमधील विहिरींचे वैशिष्ट्य कोड्यात टाकणारे आहे. दोन फूट रुंद व तीन फूट लांबीच्या किंवा अडीच फुटी व्यासाच्या बऱ्याच विहिरी येथे आढळतात. मोटारस्टँडवर असणारी विहीरही फार पूर्वीची आहे. तिला उपसले असता अनेक मानवी हाडे, बांगड्या या विहिरीत आढळल्या होत्या. परकीय आक्रमणात शत्रूंपासून आपली इभ्रत वाचवण्यासाठी स्त्रियांनी येथे प्राण त्यागले असावे, असे इतिहासकारांचे म्हणणे आहे.

इंग्रजांच्या राजवटीत या ठिकाणचे महत्त्व कमी झाले. वैभव कमी होत गेले. एकेकाळी हिंदूंचे धार्मिक स्थळ आणि ज्ञान, विद्येचे वर्चस्व राहिलेला हा जिल्हा विविध आक्रमणे आणि नंतर इंग्रजांनी दुर्लक्षित केल्याने आपला विकास करू शकला नाही.

खंडहरांची संख्या वाढत गेली. श्री चिंतामणीचे मंदिर जर वगळले तर असे ठसठशीत आकर्षण या गावाला राहिले नाही. भरपूर कापूस, भाजीपाला, मोठमोठाले कोहळे आणि केळीचे उत्पादन असा काही उत्पादकतेचा भाग सोडला तर नंतर वणी आणि यवतमाळ यांच्या विकासाच्या तुलनेने कळंब मागे पडले. ज्या असंख्य विहिरी आणि चक्रावती नदीच्या भरपूर पाण्याच्या आधाराने येथील शेती प्रसिद्ध होती, त्या शेतीला आज पाणी मिळेनासे झाले आहे. चक्रावतीला पाणी नाममात्रच राहिले आहे. विहिरी खोल गेल्या आहेत. पावसाचे प्रमाण कमी झाल्याने उन्हाळ्यात त्या आटतात. पाण्यासाठी लोकांना वणवण फिरावे लागते. चिंतामणीपुढ्यात साक्षात गंगा अवतरण्याच्या घटना पाहता या परिसरात पाण्याचे दुर्भिक्ष्य का व्हावे, हा प्रश्न भाविकांना पडणे साहजिक आहे.

# गृत्समद ऋषी

चिंतामणी मंदिरातील कुंडातील पाण्याने आज जरी चर्मरोग बरा झाल्याचा अनुभव कुणी सांगत नसले तरी मुद्‌गलपुराणात राजा रुक्मांगदाचा कुष्ठरोग बरा झाल्याची कथा आहे. इंद्रकथेशी या कथेचे साम्य आहे. रुक्मांगदाच्या कथेतून या कळंबनगरीत जन्मलेले, वास्तव्य केलेले व आपल्या अनेक शोधांनी नावलौकिक मिळविलेले गणपतीचे निस्सीम भक्त गृत्समद ऋषी यांची माहिती आपल्याला मिळते. गृत्समदांचा काळ हा सुमारे वीस हजार वर्षांपूर्वीचा गणला जातो.

या भूमीत वाचनकवी नावाचे एक अत्यंत प्रतिभासंपन्न ऋषी वास्तव्य करून होते. सौंदर्याची मूर्तिमंत पुतळी म्हणजे वाचनकवींची पत्नी मुकुंदा. एकदा कुंडीनपूरचा राजा रुक्मांगद शिकार करण्यासाठी या कदंबवनात आला. मध्यान्हीच्या

सांजसंध्याकर्मासाठी वाचनकवी ऋषी नदीच्या तीर्थावर गेले होते. उन्हात फिरून दमलेल्या रुक्मांगदाला तहान लागली, म्हणून तो आश्रमात आला. पाणी देण्यासाठी समोर आलेली ऋषीपत्नी मुकुंदा राजाच्या रूपावर भाळली. आपली कामवासना तृप्त करावी, म्हणून तिने रुक्मांगदाला गळ घातली. सच्चरित्र रुक्मांगद पाणी न पिता ताबडतोब तिला अव्हेरून निघून गेला. कामाग्नीने विव्हळ झालेल्या मुकुंदेने त्याला 'तू कुष्ठरोगी होशील' असा शाप दिला आणि राजाचे शरीर कुष्ठाने विद्रूप झाले. राजाने कर्मगतीला दोष देत तिची विकृत इच्छा पूर्ण न करता तेथून गमन केले. निराशावस्थेत तो जंगलात फिरत असता नारदांनी त्याला श्री चिंतामणी मंदिरातील गणेशकुंडातील जलाने स्नान केल्याने कुष्ठरोग दूर होईल, असे सांगितले. त्याप्रमाणे राजा रुक्मांगदाने स्नान केल्यावर त्याची काया पूर्ववत तेजःपुंज आणि नितळ झाली.

इकडे कामवासना अनावर झालेल्या मुकुंदेला पाहून एका अलौकिक व्यक्तीच्या जन्माचा मुहूर्त आहे, हे ध्यानात घेऊन इंद्राने रुक्मांगदाचे रूप घेऊन फसविले आणि तिचा उपभोग घेतला. मुकुंदेच्या ठायी बीजारोपण झाले. महर्षी वाचनकवी यांना हे काहीच माहीत नव्हते. योग्य समयी मुकुंदेला पुत्र झाला. त्याचे नाव गृत्समद ठेवले. तरुणपणी हा अत्यंत तल्लख बुद्धीचे गृत्समद - वाचनकवी आणि मुकुंदेचे पुत्र - मगध देशात गेले. तेथे आपल्या अप्रतिहत बुद्धिसामर्थ्याने वादविवादात तेथे जमलेल्या सर्व ऋषीमुनींचा त्यांनी पराभव केला. त्यांचे हे यश अत्री ऋषींना सहन झाले नाही. ते छद्मीपणाने गृत्समदांना म्हणाले, 'तू ऋषीपुत्र नाहीस. क्षत्रिय राजा रुक्मांगदाचा तू पुत्र आहेस. तुला वादविवादाचा अधिकारच नाही.' या वक्तव्याने घायाळ झालेला गृत्समद आपल्या मातेकडे येऊन तिला जन्माचे रहस्य विचारू लागला. मुलाच्या विद्वत्तेबद्दल अभिमान असलेल्या मुकुंदेने खरी

हकिकत त्याला सांगितली. रुक्मांगदाच्या रूपात आलेल्या इंद्रदेवाच्या समागमातून हा पुत्र झाला आहे, हे तिलाही माहीत नव्हते. मात्र स्वजन्माची कहाणी मातेच्या मुखातून ऐकल्यावर तरुण गृत्समदाने देहत्यागाचा विचार पक्का केला. मातेला त्यांनी शाप दिला, 'तू जन्मानुजन्म कंटकीवृक्ष होशील, तुझ्या सहवासात कोणताही पक्षी राहणार नाही.' त्याच वेळी आकाशवाणी झाली की, 'गृत्समदा, तू रुक्मांगदपुत्र नसून देवाधिदेव इंद्राचा पुत्र आहेस. तू गणेशाची आराधना कर. तुझा सर्व मानसन्मान तुला परत मिळेल.' मातेवर नाराज असलेले महर्षी गृत्समद विदर्भापासून दूर पुण्याजवळ आठ किलोमीटर अंतरावर असलेल्या थेऊर गावी गेले व तेथे त्यांनी अनुष्ठान मांडले.

'गणानां त्वां गणपतिं हवामहे' या मंत्राचे पुरश्चरण करून त्यांनी बारा वर्षे तपश्चर्या केली. त्या ठिकाणी भगवान गणेश प्रकट होऊन त्यांनी गृत्समदांना अनेक वरदाने दिली. जपास बसलेल्या जागेसमोरच गृत्समदांनी श्री चिंतामणीची स्थापना केली. म्हणूनच थेऊरचा गणपती 'चिंतामणी' नावाने अष्टविनायकातील द्‍वितीय क्रमांकाचा मानला जातो.

त्यानंतर गृत्समद ऋषींना सर्वत्र मानसन्मान मिळू लागला. ते लगेच आपली जन्मभूमी कळंब येथे आले. ऋग्वेदातील दुसरे मंडल लेखनाचा मान त्यांचाच आहे. विदर्भातील जनता दरित्री आहे, ह्याचे कारण ती आळशी आहे, हे जाणून त्यांनी वैदर्भीय जनतेला एक मोलाचा सल्ला दिला. 'मा अहं अन्य कृतेन भोजयेयम्' म्हणजेच 'मी दुसऱ्यांच्या कष्टावर जगणार नाही. स्वावलंबनाने स्वतःचे भोजन करीन. कष्टाशिवाय काळ घालविणार नाही', अशी श्रमाची प्रतिष्ठा त्यांनी जनतेला समजावून सांगितली.

एक थोर संशोधक म्हणूनही त्यांना कीर्ती लाभली आहे. गृत्समद हे विज्ञानवादी, गणिततज्ज्ञ, कृषी संशोधक होते. पुरातन

काळी भूभाग हा जंगलांनी व्यापलेला होता. क्वचितच मानवी वस्ती आढळायची. त्या छोट्याशा कळंबच्या वस्तीत गृत्समदांनी कापसाचा शोध लावला. आज आपण विदर्भाला कापसाचे भंडार म्हणून ओळखतो. या कापसाचा शोध लावल्यानंतर त्यांनी त्यापासून तंतू किंवा धागा निर्माण करण्याचा शोध लावला. कापसाचा धागा पक्का कसा निघेल आणि त्यापासून वस्त्र कसे विणता येईल, यासाठी गृत्समदांनी 12 वर्षे सतत प्रयत्न आणि परिश्रम केले. जगात सर्वप्रथम कापूस लागवड गृत्समदांनीच केली. कापसापासून सूत काढणे आणि सुताचे कापड विणणे हे सर्व शोध त्यांनीच जगाला दिले. आजही कळंब परिसरातील जमीन कापूस उत्पादनाच्या दृष्टीने फारशी सुपीक नसतानाही या भागात भरपूर प्रमाणात कापूस उत्पादन होते.

गणितातील गुणाकार, भागाकाराची कल्पना सर्वप्रथम गृत्समद ऋषींनीच मांडली. तत्पूर्वी बेरीज व वजाबाकी या दोनच क्रिया होत्या. बेरजेच्या तत्त्वाचे उन्नत रूप म्हणजे गुणाकार तर वजाबाकीच्या प्रक्रियेचे सुलभ रूप भागाकार होय, हे दाखवून गृत्समद ऋषींनी गणिती क्रांती केली. दुसऱ्यांच्या श्रमांवर जगणे गृत्समदांना मान्य नव्हते. लोक व्यवहाराला सुलभ व्हावे, या दृष्टीने त्यांनी सतत चिंतन केले. कदाचित त्यातूनच पुढे गुणाकाराचा शोध आणि दोनपासून नऊपर्यंत पाढे निर्माण करण्यात त्यांना यश आले. ज्या दिवशी हा शोध त्यांना लागला, त्या दिवशी ते आनंदाने नाचू लागले. त्या भावनिक वेगामध्येच त्यांनी पाढ्याच्या रूपामध्ये इंद्रदेवाचे आवाहन केले.

‘आ द्वाभ्यां हरिभ्यामिंद्र याहि,
आ चतुर्भिरा षड्भिर हूयमानः’

‘हे इंद्रा, तुम्ही दोन घोड्यांच्या, चार घोड्यांच्या, सहा घोड्यांच्या रथावर बसून अतिवेगाने या.’

स्त्रियांच्या गर्भावर शुक्लपक्ष आणि वद्यपक्षातील चंद्रकिरणांचा वेगवेगळा प्रभाव पडतो, हेही त्यांनीच शोधून काढले. स्त्रियांच्या गर्भावर चंद्राचा परिणाम होतो, असे म्हणण्यापेक्षा चंद्राच्या प्रकाशातच गर्भाची वाढ होते, असे त्यांनी पटवून दिले. चंद्र कलेकलेने वाढतो. गर्भातील जीवाला सूर्यप्रकाशाच्या दाहकतेपासून चंद्राचे शीतल किरणच रक्षण करीत असावेत, असे सांगताना गृत्समद पौर्णिमेला उद्देशून म्हणतात,

'ददातु वीरं शतदायं उक्थम्'

'हे पौर्णिमे, शतपटीने देणारा पराक्रमशील आणि प्रशंसनीय असा सेवक दे.'

ऋग्वेदामध्ये एकूण 10 मंडल आहेत. त्यातील द्वितीय मंडलाचे कर्ते गृत्समद ऋषी आहेत. या मंडलात 43 सूक्त आणि 400 च्यावर मंत्र आहेत.

'गणानां त्वा गणपतिं हवामहे,
कविं कवीनांमुपश्रवस्तम्,
ज्येष्ठराजं ब्रह्मणां ब्रह्मणपस्ते,
आ नः शृण्वन्नूतिभिः सीद सादनम्'

हा मंत्र गृत्समदांनी रचला आहे. या मंत्रात ते म्हणतात, 'हे बृहस्पते, आपण सर्वगणांचे गणपती म्हणजे गणांचे प्रमुख आहात, सर्व कवींमध्ये श्रेष्ठ आहात.' बृहस्पती वाणीचे अधिदैवत आहे. म्हणजे बृहस्पती एका अर्थाने गणपतीच आहेत. ॐकार शब्द ब्रह्मवाचक आहे. ब्रह्मणस्पती म्हणजे वाङ्मयाची किंवा साहित्याची देवता, असे उपनिषदकारांचे म्हणणे आहे. कदाचित म्हणूनच गणपतीची मूर्ती ही ॐकाराच्या आकाराची घडविली असावी, असे वाटते.

गृत्समद ऋषी आणि जैनांचे प्रथम तीर्थंकर ऋषभदेव यांची भेट घडून आल्याचे उल्लेख आढळतात. ऋषभदेव

गृत्समदांच्या कुटीत दोन दिवस वास्तव्यास होते, त्या दोन दिवसांत त्यांच्या बऱ्याच अध्यात्मिक चर्चा झाल्याची नोंद आढळते.

असे हे अलौकिक व्यक्तिमत्त्व श्री गृत्समद ऋषी यांची कळंब ही जन्मभूमी तसेच कर्मभूमी आहे.

# कळंब तालुक्यातील नामवंत, प्रज्ञावंत

कळंबचे मूळचे वैभव जरी आज शिल्लक नसले, तरी विद्या आणि ज्ञान या बाबतीत हे गाव आघाडीवर असल्याचे दिसते. इथली प्राथमिक शाळा सुमारे दीडशे वर्षांपूर्वीची आहे. कळंब येथील काही जमीन पारवेकर देशमुखांना निजामाने इनाम दिली होती. पारवेकरांचे एक शिवमंदिर गावाबाहेर असून त्यांची व्यवस्था कळंबकर नावाच्या एका जंगमाकडे आहे. इतिहास संशोधक श्री. प्र.रा. देशमुख, विज्ञानपंडित डॉ. काजळे, पद्मभूषण मिळवलेले भूगर्भशास्त्रज्ञ श्री. वामनराव मेत्रे, त्यांच्या कन्या बालरोगतज्ञ डॉ. क्षमा मेत्रे ह्या मूळच्या कळंबच्याच व्यक्ती. स्त्रीमुक्तीची चळवळ चालवणाऱ्या डॉ. सीमा साखरे, शल्यतज्ञ श्री. वामनराव काळे, नंतर अमेरिकेत स्थायिक झालेले विधितज्ञ श्री. मनोहरराव काळे, उर्दूपर्शियन भाषेचे जाणकार नंतर अमरावतीच्या राज महाविद्यालयात ह्या भाषा शिकविण्यास गेलेले डॉ. खतीब हे कळंबचेच. त्यांची मुले पुढे इंग्लंडला गेली, उद्योगक्षेत्रात पश्चिम महाराष्ट्रात नावाजलेले दुसरे खतीब प्रसिद्ध 'मेंडले' नावाची औषध कंपनी चालवतात. 'चलेजाव' चळवळीत आणि जंगल सत्याग्रहात आघाडीवर असलेले श्री. नारायणराव कठाळे, शिक्षण क्षेत्रात भरीव कार्य करणारे, सुप्रसिद्ध साहित्यिक, आदिवासी सेवक पुरस्कारप्राप्त डॉ. भाऊ मांडवकर हेही कळंबचेच.

भूगर्भशास्त्रज्ञ व तेल संशोधक म्हणून वामनराव मेत्रे यांनी जगात नाव कमावले. त्यांचा जन्म 1906 साली कळंब येथे झाला. कळंब, यवतमाळ आणि नागपूर येथे शिक्षण घेतल्यावर त्यांनी स्वातंत्र्यानंतर 1959 मध्ये 'बोर्ड ऑफ ऑईल इंडिया लि.'चे संचालकपद स्वीकारले. तत्पूर्वी भूगर्भ संशोधन आणि तेल उत्पादन क्षेत्रातील त्यांची रुची पाहून 1939 साली ब्रिटीश तेल संशोधन कंपनीने त्यांना लंडन येथे पाठवले. तेल उद्योग व भूगर्भ संशोधनाच्या विविध देशांतील अनेक आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये त्यांनी भारताचे प्रतिनिधित्व केले. 1953 मध्ये आंतरराष्ट्रीय समूदायाने त्यांना 'तेल संशोधक' म्हणून मान्यता दिली. 1962 मध्ये नैसर्गिक वायू आणि तेलसंशोधक संदर्भात तेहरान येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत त्यांनी बहुमोल कामगिरी बजावली. त्यांना भारत सरकारने 1967 साली 'पद्मभूषण' किताबाने सन्मानित केले. पं. नेहरूंशी त्यांचे घनिष्ठ संबंध होते. प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. होमी जहांगिर भाभा यांच्याशी दाट मैत्री होती. 1970 मध्ये त्यांचे दिल्लीत निधन झाले.

डॉ. क्षमा मेत्रे यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये अतुलनीय कामगिरी केली. बालरोगतज्ञ डॉ. मेत्रे यांना 'वुमेन ऑफ द इअर' या पुरस्कारासह डझनभर पुरस्कार मिळाले. त्यात सर्वाच्च पुरस्कार म्हणजे भारत सरकारचा 'पद्मश्री पुरस्कार' होय.

सव्वाशे पुस्तके लिहिणारे विदर्भातील पहिले लेखक, शिक्षणतज्ञ, विदर्भ साहित्य संमेलनाचे 1991 सालचे अध्यक्ष, आदिवासी संशोधनात मोलाची भूमिका बजावणारे, 'कोलाम' या त्यांच्या प्रबंधाने जगभरात नाव झालेले, अनेक पुरस्कार प्राप्त डॉ. भाऊ मांडवकर यांनी 2008 मध्ये मरणोपरान्त देहदान आणि नेत्रदान करून समाजाला समाजऋणमुक्तीचा मार्ग दाखवला आणि ते कळंब नगरीचे भूषण झाले.

15 ऑगस्ट 1933 रोजी कळंब तालुक्यातील सोनेगाव येथे लहानुजी तानबाजी आकोलकर यांच्या पोटी जन्माला आलेल्या डॉ. सीमाताई साखरे यांचे स्त्रीमुक्ती चळवळीतील योगदान मोलाचे आहे. वडील शिक्षक असल्याने कळंब येथे त्यांची बदली झाली आणि सीमाताईंचे बालपण कळंबच्या गढीजवळ व्यतीत झाले. वडिलांनी नोकरी सोडून स्वातंत्र्यलढ्यात उडी घेतल्यावर सीमाताईंच्या आईने दुधाचा व्यवसाय करून घर सांभाळले व सीमाताई बालवयातच ताकाचा पिपा डोक्यावर ठेवून ते विकावयास गावात फिरत. अशा एका प्रसंगी गाडगेबाबांनी त्यांच्या डोक्यावर हात ठेवून शिकण्याचा सल्ला दिला. त्यांच्या प्रभावाने त्यांनी स्त्रीशिक्षणाकडे व स्त्रियांच्या उद्धाराकडे आपले लक्ष वळविले. भारत सरकारच्या ‘राष्ट्रीय स्त्री रत्न पुरस्कारा’सह त्यांना अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत.

## कळंब तालुक्यातील स्वातंत्र्यसंग्राम सैनिक

कळंब तालुक्यातील 11 स्वातंत्र्यसंग्राम सैनिकांनी जंगल सत्याग्रहात भाग घेतला होता. महात्मा गांधींप्रमाणेच यवतमाळच्या लोकनायक बापूजी अणे यांच्या विचारांचा पगडा त्याकाळी कळंबमधील युवकांवर पडला होता. 1920 मधील गांधीजीच्या असहकार चळवळीचे व 1930 च्या कायदेभंग चळवळीचे यवतमाळातील नेतृत्व लोकनायक अणे यांच्याकडे होते. बापूजींनी जंगल सत्याग्रह करून कायदेभंग करण्याचे ठरविले व तशी हाक दिली. कळंब तालुक्यातील 11 युवकांनी या चळवळीत उडी घेतली. त्यातील काहींना इंग्रजांनी शिक्षाही केली. आष्टेकर वासुदेव आष्टी, मराठा चंपत उमरू, माळी महादेव शिवराम, माळी रामभाऊ महादेव, शिवराम केवटे, लक्ष्मण कुटेमाटे, तुळशीराम देवतळे,

वसनजी कारिया, अंबादास काळे, नारायण कठाळे, सूर्यभान भिसे या अकरा युवकांनी इंग्रजांना सळो की पळो करून सोडले. 6 ऑक्टोबर, 1930 रोजी शिवराम केवटे यांना सर्वात कमी वयाचे म्हणून जंगल ॲक्ट सेक्षन 26 नुसार 200 रुपये दंड झाला होता. आज यांच्यापैकी एकही जण हयात नाही.

स्वातंत्र्य चळवळीनंतर 1955 च्या गोवा मुक्ती संग्रामातही लोहपुरुष सरदार वल्लभभाई पटेल यांच्या हाकेला ओऽऽ देत तालुक्यातील युवकांनी उडी घेतली. त्यात स्वातंत्र्य संग्राम सैनिक भगवंतराव मांडवकर, बापूराव मस्कर, लक्ष्मण हजारे यांचा समावेश होता. कळंबच्या इतिहासात स्वातंत्र्यलढ्यातील या युवकांना विसरून चालणार नाही.

## कळंब येथे सापडलेल्या एका मूर्तीविषयी

1985 च्या मे महिन्यात श्री. नामदेव शांताराम नाईक यांना झोपडी बांधण्यासाठी खड्डा करत असताना एक मूर्ती खोदकामात आढळली. नवीन बांधलेल्या विश्रामगृहाच्या बाजूला जुन्या स्मशानभूमीच्या जागेवर जमिनीपासून अवघ्या साडेतीन फुटांवर ही मूर्ती उपड्या अवस्थेत सापडली. प्रथमदर्शनी ही मूर्ती धातूची वाटत होती. शिल्पकलेचा उत्कृष्ट नमुना असलेली ही मूर्ती कोणत्या देवतेची, याविषयी दीर्घकाळ मंथन होऊनही निश्चित सांगितले जात नव्हते. ती श्री विष्णूची असावी, असे जाणकार सांगत होते. काहींच्या मते ती शैव किंवा गाणपत्य संप्रदायातील असावी. ह्या मूर्तीचा वरचा भाग पुरुषाप्रमाणे तर कंबरेखालील भाग स्त्रीचा वाटत होता. मूर्तीच्या पायांच्या बोटांत जोडवे असून गळ्यात जानवेही होते. मूर्तीच्या पायांपासून खालपर्यंत मुंडक्यांची माळ होती. काहींना ती मूर्ती महाकालीची वाटत होती.

अनेक संशोधकांनी संशोधन करून काही आडाखे बांधले. डॉ. भाऊ मांडवकर यांनी यासंदर्भात संशोधन करून 'कळंब येथे सापडलेली मूर्ती' या शीर्षकाखाली एक लेख लिहिला. तो 'दै. लोकमत'च्या साहित्य जत्रा पुरवणीत दि. 18 ऑगस्ट, 1985 रोजी प्रकाशित झाला. नंतर त्यांच्या 'पांजरा' या पुस्तकात तो समाविष्ट करण्यात आला. त्यांच्या संशोधनानुसार पायात जोडवी आहेत, म्हणून या मूर्तीला स्त्रीची समजण्याचे कारण नाही. या मूर्तीचा समग्र भाग हा पुरुषाचाच वाटतो. पुरातन काळी स्त्रीचे उरोज उन्नत दाखवण्याचा कल येथे नाही. त्यावेळच्या पुरुषमूर्तींप्रमाणे छातीची ठेवण आहे. पायातल्या अलंकारांना जोडवीच असावीत, असेही म्हणता येणार नाही आणि प्राचीन काळी पुरुषही अलंकार ग्रहण करीत असत.

जेथे ही मूर्ती सापडली, पूर्वी तेथे दाट वस्ती असावी, असे तेथे आढळणाऱ्या पांढऱ्या मातीवरून लक्षात येते. चक्रावती नदीचा हा पश्चिम काठ असून तो देवदेवळांनी समृद्ध असावा. या जागेला लागूनच इस्लामांचे जुने स्मशान आणि बासरीवाला बाबांचा दर्गा आहे. इस्लामी आक्रमकांच्या भीतीने अनेक मूर्ती लपवल्या असाव्यात किंवा देवळे पडझडीत दबली असावीत. ही मूर्ती सापडली तो भागही नदीपासून जवळ आहे आणि पूर्वी या नदीला पूर येत असावे. पुरातही देवळांची पडझड झाली असावी. या संपूर्ण जागेत पडके पाये, भुयारे, विटा आदींचे अवशेष नेहमीच आढळत आले आहेत.

कळंबमध्ये सापडलेल्या या मूर्तीचे सुरुवातीला आलेले समज हे चुकीचे असल्याने पुढेही दीर्घकाळ तसेच राहिले. सुमारे सव्वाशे वर्षांपूर्वी श्री चिंतामणी मंदिराजवळील खोदकामात सापडलेल्या पार्वतीच्या मूर्तीला लोक 'अनसूया'च मानतात. या भागात दत्तभक्त अधिक असल्याने पार्वतीची जी अनसूया झाली

ती त्याच भ्रमावर टिकून राहिली. काही वर्षांपूर्वी हलबीपुऱ्यात सापडलेल्या उभ्या अवस्थेतील मूर्तीला 'नारायणविष्णू' संबोधले गेले. वस्तुतः ती मूर्ती अनंगाची म्हणजेच मदनाची आहे.

मदनाच्या मूर्तीशी या मूर्तीचे साम्य आहे. कालखंड बारावे, तेरावे शतक असावा. विष्णूची ही मूर्ती असावी, असे अभ्यासकांना वाटते. विष्णूच्या मुखाच्या व मानेच्या मागे सूर्यवलय कोरलेल्या मूर्ती भारतात आहेत. तशीच ही मूर्ती आहे. त्रिवेंद्रम, तंजावरम, बंगालातील टोप परिधान करणाऱ्या विष्णुमूर्तीप्रमाणे या मूर्तीनेही मुकुट परिधान केला आहे. विष्णुमूर्तीप्रमाणे ह्या मूर्तीला चार हात आहेत. उजव्या हाती त्रिशूळ आहे. खालच्या डाव्या हाती गदा आहे. याशिवाय विष्णूच्या आयुधांमध्ये असणारे शंख, चक्र, पद्म इत्यादी गोष्टीही या मूर्तीत आहेत. तंजावरच्या महाविष्णूने घातलेल्या जानव्याप्रमाणे ह्या विष्णूने घातले आहे.

या मूर्तीच्या गळ्यातील नरमुंडमाला पाहून काहींनी ती दुर्गा किंवा कालीची मूर्ती असावी, असे जे म्हटले, ते बरोबर नाही. कळंबचा परिसर कोलाम समाजाची संख्या अधिक असणारा आहे. ही आदिम जमात व अन्य गोंड, परधान, आंध अशा मागासलेल्या जमातीही या परिसरात असल्याने आदिवासींच्या श्रद्धा, अंधश्रद्धा, समजुतीही भरपूर आहेत. जादूटोणा हा प्रकारही त्यांच्या जीवनाला चिकटला आहे. बंगालातील महाकाली आणि जादूटोणा प्रकार लक्षात घेता ही मूर्ती आभिचारिक विष्णूची असावी, असे वाटते. अभिचार म्हणजे जारणमरण, जादूटोणा, मंत्रतंत्र. अशी विद्या अंगी बाणवणारा विष्णू स्वतः अशी मुंडमाला ग्रहण करणारा नसावा; परंतु श्रद्धाळूंनी ग्रंथातील कथांच्या आधारे ही मूर्ती आदिम श्रद्धांना धरून बनविली असावी.

# कळंबच्या 'पार्वती'च्या मूर्तीबाबत

सोमवार दि. 14 जानेवारी, 1991 रोजी पहाटे किंवा आधल्या दिवशी रविवारी श्री चिंतामणी मंदिरासमोरील दोन छोटेखानी मंदिरातून - जेथे श्री दत्ताची आणि पार्वतीची मूर्ती होती - तिथून पार्वतीची मूर्ती चोरी गेली. भक्तांची श्रद्धा म्हणजे ती मूर्ती दत्तमाता अनसूयेची आहे. कळंबजवळचा परिसर दत्तमार्गी असल्याने या मूर्तीला अनसूयामाता  मानण्याकडे लोकांचा कल होता. ग्रामीण भागात अनसूयेला अनुसया असे म्हणण्याचा प्रघात आहे. यवतमाळचे जगप्रसिद्ध संशोधक डॉ. यशवंत खुशाल देशपांडे यांनी 1950 च्या दरम्यान ही मूर्ती पार्वतीची असल्याचे मत मांडले होते. 1980 मध्ये पुण्याचे संशोधक डॉ. प्र.ल. सासवडकर कळंबला डॉ. भाऊ मांडवकरांकडे आले असता या दोघांनी अनेक मूर्त्यांची छायाचित्रे काढली होती. त्या छायाचित्रांचा अभ्यास करून डॉ. सासवडकर पुण्याला गेल्यावर त्यांनी ही मूर्ती अन्नपूर्णा पार्वतीचीच असल्याची खात्री दिली होती.

ही मूर्ती चोरी गेल्यानंतर गावकरी हळहळले. त्या मूर्तीचे मूळ छायाचित्र कोणाचकडे उपलब्ध होत नव्हते. पत्रकारांपासून अनेक नामवंत त्या छायाचित्राचा शोध घेत असताना त्या मूर्तीचे एक छायाचित्र कळंबचे संशोधक, साहित्यिक डॉ. भाऊ मांडवकर यांच्याकडे सापडले. वास्तविक ही मूर्ती अत्यंत सुंदर, सुडौल अशी होती. नंतर भक्तांनी तिला हळद, कुंकू वाहण्याच्या प्रथेमुळे व कपडे घातल्याने तिचे मूळ रूप भक्तांनाही पहायला मिळत नव्हते.

ही मूर्ती यादवकालीन किंवा त्यापूर्वीच्या निकटच्या काळातील असावी. बाराव्या-तेराव्या शतकात अशा मूर्ती तयार होत असत. या धाटणीच्या मूर्ती नवव्या शतकापासून तयार होत गेल्याने त्यापूर्वीची ती नसावी. म्हणजे ही मूर्ती सुमारे 1000

वर्षांची असावी. मूर्तीचे सर्व अवयव ठसठशीत असून कटिभाग निमुळता होता. डोक्यावर महाराणीला शोभावा असा टोप होता. गळ्यात हार, खाली कमरपट्टा व अन्य अलंकार यांमुळे ही मूर्ती कमरेपासून पोटऱ्यांपर्यंत वस्त्राच्छादित असावी, असा वकूब निर्माण झाला होता. पायांत पैजणे व अन्य अलंकार तसेच खडावा घातल्या असल्याचे निदर्शनास येत होते. मूर्तीला चार हात होते. उजव्या हातात माला, डाव्या हातात कमंडलू, मागच्या हातांतील रेखनात वरल्या बाजूला गणपती आणि शिवलिंग होते. पायांच्या दोन्ही बाजूंना सेविकारूप युवतींच्या दुय्यम मूर्ती कोरलेल्या होत्या. या मूर्तीच्या आधारशीलेचा भाग एखाद्या देवळाच्या पार्श्वभूमीसारखा कोरीव कलाकसरयुक्त सजावटीचा होता. 1985 मध्ये जी मूर्ती कळंबमध्ये सापडली, त्या मूर्तीच्या तुलनेने ही मूर्ती आकाराने अर्धी होती, म्हणजे सुमारे पावणेदोन फूट उंचीची होती.

या मूर्तीप्रमाणेच परंतु काहीशा डाव्या दिसणाऱ्या मूर्ती यवतमाळ जिल्ह्यातील केळापूर या गावी होत्या. अशीच मूर्ती आंध्रातील वारंगल येथे आहे. तेथे दुसऱ्याच नावे तिची पूजा केली जाते.

ही मूर्ती चोरी गेल्यावर तिचा शोध न लागल्याने भक्तांनी तेथे नवीन मूर्तीची स्थापना केलेली आहे. मात्र तिला अनसूया माता असे संबोधले जाते.

# विंध्यवासिनी देवी

कळंबचा परिसर हा डोंगरांनी व्यापलेला आहे. जवळच असलेल्या निरंजन माहूर किंवा खटेश्वर-जोडमोहाच्या मार्गावर कळंबपासून तीन किलोमीटर अंतरावर एका निसर्गरम्य टेकडीवर एक लहानसे नवीन मंदिर आहे. त्या टेकडीला ‘इदासिनीची टेकडी’

तर मंदिरातील देवीला ‘विंध्यवासिनी’ किंवा ग्रामीण, आदिवासी ‘इदासिनी’ म्हणतात. या टेकडीच्या दक्षिणेस दत्त निरंजन माहूर, उत्तरेस श्री चिंतामणी मंदिर, पूर्वेस दुर्गचा किल्ला आणि पश्चिमेस यवतमाळच्या डोंगररांगा आहेत.

साधारणतः 1998-99 च्या सुमारास एका गुराख्याला या टेकडीवर सर्वात उंच शिखरावर पळसाच्या झाडाखाली एक विशिष्ट आकाराचा दगड दिसला. ही माहिती त्याने अनेकांना सांगितली. कुतूहलाने गावातील बरेचजण तो दगड पाहायला गेले. दगडावरील शेंदूर त्यांनी बाजूला केला असता त्या दगडात देवीचे सुंदर रूप त्यांना आढळून आले. त्यांनी ती दगडातील मूर्ती त्या टेकडीच्या शिखरावरून थोडी खालच्या भागाला आणली. तिथे ती मूर्ती स्थापित केली. वर शिखरावर चढणे अत्यंत कठीण होते. टेकडीचे शिखर निमुळते होत गेल्याचे निदर्शनास येते. त्यामुळे ही मूर्ती शिखरावरून सुमारे पन्नास मीटर खाली आणली असावी.

ही मूर्ती काळ्या पाषाणाची आहे. सध्या तिच्या डोक्यावर सोनेरी मुकुट आहे. देवीला चार हात असून एका हातात खडगे तर दुसऱ्या हाती खप्पर दिसते. देवीच्या पायखाली रेडा आहे. मागील बाजूला सिंह रेड्यावर आक्रमण करण्याच्या पावित्र्यात दिसतो. मूर्ती अत्यंत सुंदर आहे; परंतु सहसा ही मूर्ती वस्त्र परिधान केलेली असते. त्यामुळे मूर्तीचे संपूर्ण रूप पाहता येत नाही. कळंबमध्ये अनेक मूर्ती सापडल्या आहेत, त्यातही काळ्या पाषाणाच्या अधिक आहेत. त्यांच्या कालखंडाचा अभ्यास करणाऱ्यांनी बारावे किंवा तेरावे शतक त्यांच्या निर्मितीचे असावे, असे मत मांडले आहे. ते मत या मूर्तीबाबतही लागू पडेल.

मूर्ती ज्या मूळ जागी शिखरावर सापडली, तिथे पूर्वी शेकडो वर्षांपूर्वीच्या विटांनी बांधलेले मंदिर असावे, असे काही अवशेष आढळतात. शिखराच्या सर्वबाजूंनी विटांनी बांधकाम केले

असावे, असे वाटते. गावकऱ्यांच्या मते चिरेबंदी दगडांनी ही टेकडी किंवा वरचे टोक रचले असावे. त्या दगडांतून आत जाणारा भुयारी मार्ग असावा, असेही सांगितले जाते; परंतु तशा फारशा खुणा आज नाहीत. या टेकडीवरून चारही बाजूंचे दृश्य विलोभनीय असे दिसते. डोंगरांच्या रांगा, दत्त शिखर, कळंबची वस्ती अशा सर्व दृश्यांना येथून कॅमेराबंद करता येतं. पूर्वी दुर्गच्या किल्ल्यावर राज्य करणाऱ्यांनी या टेकडीवरून काही सैनिकांना निरीक्षणार्थ ठेवून शत्रूंचे संकेत देण्यासाठी काही योजना केल्या असाव्यात, असे म्हणण्यास वाव आहे. परकीय आक्रमणाच्या वेळी सुरक्षिततेसाठी ही मूर्ती या टेकडीवर आणून ठेवली असावी, असेही वाटते.

आज मूर्तीभोवताल छोटेखानी मंदिर बांधकाम सुरू आहे. भक्तांतर्फे नवरात्रात व चैत्र नवरात्र उत्सवात येथे कार्यक्रम आयोजित केले जातात. महाप्रसाद दिला जातो. लोकवर्गणीतून एक 15 फूट रूंदीची व 35 फूट खोल विहीर खोदण्यात आली. टेकडी चढताना थोड्याशा अंतरावर ही विहीर खोदली व बांधली आहे. खोदताना दीर्घकाळ पाणी लागले नाही, तेव्हा येथील भक्त, आदिवासी, गावकरी चिंतेत पडले. संपूर्ण दगडी भाग असल्याने अनेक वेळा ब्लास्टिंग केले गेले. शेवटी खोदकाम करताना निराश भक्त ते काम थांबवण्याच्या विचारात असतानाच 35 फुटांवर पाणी लागले, ते इतके की त्यानंतर ती विहीर कधीच आटली नाही. कळंबमधील सर्व विहिरी आटल्या तरी या विहिरीला पाणी राहते.

या टेकडीवरील देवीपर्यंत जायला लोकवर्गणीतून दगडी पायऱ्या तयार केल्या गेल्या; परंतु वर गाडी जात नसल्याने मंदिर बांधकामाचे साहित्य नेणे अत्यंत कठीण जाते. ग्रामीणांना ही टेकडी चढायला त्यांच्या श्रद्धेमुळे काहीच कठीण जात नाही; परंतु शहरी भक्तांना मात्र हा प्रवास कठीण वाटतो.

# श्री चिंतामणी मंदिराची सुरुवातीची कार्यकारिणी

विसाव्या शतकाच्या सुरुवातीला श्री. सदाशिव गणेश व्यास हे चिंतामणी मंदिराचे पुजारी होते. काहीतरी रचनात्मक काम करावे, मंदिर सुघटित व्हावे, यासाठी 20 मे, 1917 रोजी त्यांनी कळंबमधील व आजूबाजूच्या गावातील सुमारे 600 ग्रामस्थांची सभा घेतली. सर्वानुमते अध्यक्ष म्हणून श्री चिंतामणी गणेशालाच अध्यक्ष म्हणून मनोनित केले. एकूण 54 सदस्यांची एक समिती नेमण्यात आली. या समितीत पाच उपाध्यक्ष, दोन चिटणीस, दोन खजिनदार आणि चौरेचाळीस साधारण सदस्य निवडले गेले. त्यात पिंपळगावच्या श्रीमती भागिरथीबाई होरे या एकमेव स्त्रीसदस्य होत्या. सभेला कळंबच्या चहूबाजूंच्या खेड्यांतील लोक उपस्थित होतेच; पण राळेगाव, अंजनसिंगी, यवतमाळ, उमरखेड, अकोला, नागपूर या दूरच्या ठिकाणांहूनही गणेशभक्त आले होते.

या सभेत प्रत्येक सदस्याने दरवर्षी किमान तीन रुपये वर्गणी जमा करावी, असा ठराव पारीत झाला होता. तेव्हापासूनच माघ शुद्ध प्रतिपदा ते सप्तमी असा सात दिवसांचा उत्सव सुरू झाला. यात समाजप्रबोधनासाठी भजने, कीर्तने, प्रवचने, व्याख्याने आयोजित केली जात. कर्मयोगी गाडगेबाबा, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनीही आपली कीर्तने, प्रवचने येथे सादर केली होती.

# श्री चिंतामणी गणेशाचा नैवेद्य

पुराणात नमूद केल्याप्रमाणे भगवान श्री चिंतामणीला खवा, खारीक, खोबरे, खसखस व खडीसाखर या पंचखाद्याचे मोदक फार आवडतात. शुद्ध तुपात ते तळले जातात. तसेच 64 तोळे तांदूळ, 12 तोळे मुगाची डाळ, 16 तोळे तूप, 16 तोळे गुळ, 16 तोळे खोबरे, 4 तोळे मिरे, 2 तोळे सैंधव, 1 तोळा जिरे आणि शिजावयास लागणारे दूध यांपासून केलेला नैवेद्य श्री चिंतामणीचा आवडता नैवेद्य असल्याचेही नमूद आहे. तांदूळ, डाळ धुवून वाळत घातली जाते. अर्धे तूप घेऊन ते भाजले जाते. नंतर दुधात मंदाग्नीवर शिजवून तुपाशिवाय इतर पदार्थ मिसळून दूध शिंपडले जाते. निखाऱ्यावर ठेवून दूध मुरल्यावर तूप घालून सिद्धान्न तयार होते.

श्रीकुमार संहितेत या सिद्धान्नाचे वर्णन आहे. मात्र त्यात पदार्थांचे प्रमाण आकडेवारीत नाही. हे प्रमाण नंतर पुजाऱ्यांनी सांगितले असावे.

## गणेशाच्या आवडीचे

उंदीर, मोर, खेटक, शूल, एकदंत, परशू, मुन्नर, अंकुश, पाश, खट्वांग, स्वस्तिक, ॐ, मोदक, कमल, मंदार, शमी, दूर्वा, चंद्रकोर, नागबंद, अनंतफुल, विडासुपारी, सुपारी, नारळ, केवडा.

## काही श्रद्धा, काही विधी, काही विधिनिषेध

श्री चिंतामणीबाबत काही श्रद्धा आढळतात. पुत्रप्राप्तीसाठी चिंतामणीला नवस बोलण्याची किंवा पूजनाची प्रथा आहे. चिंतामणीचा आवडता नैवेद्य (सिद्धान्न) 41 दिवस चिंतामणीला दाखवून विधिवत पूजा करून पती-पत्नीने सेवन केल्याने संतती प्राप्त होते अशी एक श्रद्धा आहे. तसेच गणेशपूजनानंतर 41 दिवस

हा प्रसाद किंवा भात ग्रहण केल्यावर वरून गाईचे कपभर दूध व फळे घ्यावीत. इतर अन्न खाऊ नये, असे सांगतात. या दिवसांत ब्रह्मचर्याचे पालन करावे. या काळात येणाऱ्या सर्व चतुर्थ्यांना पूर्ण उपवास करावे व गणेशाची शमी, मंदार, दुर्वा वाहून विशेष पूजा करावी, असेही सांगितले जाते.

येथील कुंडात स्नान केल्याने कुष्ठरोग व इतर त्वचेचे रोग दूर होतात, असे मानतात; परंतु आता हे कुंड काचेने बंद केल्याने दीर्घकाळापासून हा प्रयोग केल्या गेलेला नाही.

जे विधी व विधिनिषेध पाळले जातात, त्यात शुद्ध व वद्य अशा दोन्ही चतुर्थ्यांना गणेशभक्तांनी पूर्ण उपवास करून तो पंचमीलाच सोडावा असे सांगितले जाते. द्वादशांगी म्हणजे मस्तक, कपाळ, दोन कान, गळा, दोन दंड, दोन कारवा, पाठीचा कणा अशा बारा जागी शेंदूर लावूनच गणेशपूजन करावे. शमी, दुर्वा, मंदार या वस्तूंशिवाय गणेशाची पूजा करू नये. गणपतीला तुळस केव्हाच वाहू नये. गणेशमंत्राचा यथाशक्ती जप करावा. प्रत्येक चतुर्थीला गणेशाचे दर्शन घ्यावे, पूजन करावे.

## जगातील गणेशपूजन

भारताप्रमाणेच परदेशातही गणेशपूजन होते. गणेशाच्या मूर्ती अनेक देशांत आढळतात. त्यात चीन, तिबेट, इंडोनेशिया, जावा, सुमात्रा, जपान, कंबोडिया, थायलंड, मलेशिया, ब्रम्हदेश, तुर्कस्थान इत्यादी देश आहेत. प्राचीन काळी अमेरिकेतील मेक्सिको आणि इतर प्रांतातही गाणपत्य पंथ होता. गणपतीएवढ्या अन्य कोणत्याही देवतेच्या मूर्ती जगाच्या पाठीवर आढळत नाहीत.

## हिंदू संस्कृतीतील लक्षात ठेवण्याजोगे

जगाच्या पाठीवर हिंदू संस्कृतीला अनन्यसाधारण महत्त्व आहे. हिंदू धर्मातील काही सणवार, व्रतवैकल्ये, देवीदेवता यांना कुठले ना कुठले आधार आहेत. विविध पुरातन ग्रंथांमध्ये ते नमूद आहेत. काही आधुनिक वैज्ञानिक विचारसरणीचे अभ्यासक भारतीय संस्कृती व विज्ञानाचा संबंध तपासून पाहत अभ्यास करीत आहेत.

तत्कालीन स्थलकालपरत्वेही काही गोष्टी सांगितल्या गेल्या असाव्यात व काहींचे स्पष्टीकरण दिले गेले नसेलही; परंतु त्यातील काही उल्लेखनीय बाबी, स्थळे किंवा श्रद्धास्थाने माहितीकरिता खाली नमूद केली आहेत.

1. चार युगे - कृतयुग, त्रेतायुग, द्वापारयुग, कलियुग

2. संवत्सरे - प्रभव, विभव, शुक्ल, प्रमोद, प्रजापती, अंगिरा, श्रीमुख, भाव, युवा, धाता, ईश्वर, बहुधान्य, प्रमाथी, विक्रम, वृष, चित्रभानू, सुभानू, तारण, पार्थीव, व्यय, सर्वजीत, सर्वधारी, विरोधी, विकृत, खर, नंदन, विजय, जय, मन्मथ, दुर्मुख, हेमलंबी, विलंबी, विकारी, शार्वरी, प्लव, शुभंकृत, शोभन, क्रोधी, विश्वावसू, पराभव, प्लवंग, किलक, सौम्य, साधारण, विरोधकृत, परिधावी, प्रमादी, आनंद, राक्षस, अनल, पिंगल, कालयुक्त, सिद्धार्थी, रौद्र, दुर्मती, दुंदुभी, रुधिरोगदारी, रक्तार्थी, क्रोधन, क्षय.

3. योग - विष्कंभ, प्रीती, आयुष्यमान, सौभाग्य, शोभन, अतिगंड, सुकर्मा, धृती, शूल, गंड, वृद्धी, धृव, व्याधात, हर्षण, वज्र, सिद्धी, व्यतिपात, वरियान, परिघ, शिव, सिद्ध, साध्य, शुभ, शुक्ल, ब्रह्मा, ऐन्द्र, वैधृती.

4. साडेतीन मुहूर्त - चैत्र शुद्ध प्रतिपदा (गुढीपाडवा), अश्विन शुद्ध दशमी (दसरा), कार्तिक शुद्ध प्रतिपदा (बलिप्रतिपदा), वैशाख शुद्ध तृतीया (अक्षय्यतृतीया) (अर्धा मुहूर्त)

5. नक्षत्रे - अश्विनी, भरणी, कृतिका, रोहिणी, मृग, आर्द्रा, पुनर्वसू, पुष्य, आश्लेषा, मघा, पूर्वा, उत्तरा, हस्त, चित्रा, स्वाती, विशाखा,

अनुराधा, ज्येष्ठा, मूळ, पूर्वाषाढा, उत्तराषाढा, श्रवण, घनिष्ठा, शततारका, पूर्वाभाद्रपदा, उत्तराभाद्रपदा, रेवती.

6. तिथी - प्रतिपदा, द्‌वितीया, तृतीया, चतुर्थी, पंचमी, षष्ठी, सप्तमी, अष्टमी, नवमी, दशमी, एकादशी, द्‌वादशी, त्रयोदशी, चतुर्दशी, पोर्णिमा/अमावास्या.

7. सोळा संस्कार - गर्भाधान, पुंसवन, सीमंतोन्नयन, जातकर्म, नामकरण, निष्क्रमण, अन्नप्राशन, चुडाकर्म आणि कर्णवेध (कान टोचणे), उपनयन, मेघाजनन, महानाम्नी, महादव्रत, उपनिषदव्रत, समावर्तन, विवाह, अंत्येष्टी.

8. विष्णूचे दहा अवतार - मत्स्य, कूर्म, वराह, नरसिंह, वामन, परशुराम, राम, कृष्ण, बौद्ध, कलंकी.

9. चार धाम - बद्रिकेश्वर, द्‌वारका, रामेश्वर, जगन्नाथ

10. देवीची साडेतीन पिठे - तुळजापूरची भवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची रेणुकादेवी, वणीची सप्तशृंगी (अर्धपीठ)

11. सप्त चिरंजीव - अश्वत्थामा, बली, व्यास, हनुमान, विभीषण, कृपाचार्य, परशुराम

12. सप्त ऋषी - कश्यप, अत्री, भारध्वाज, विश्वामित्र, गौतम, जमदग्नी, वशिष्ठ

13. श्रेष्ठ सप्तनगरे - अयोध्या, मथुरा, हरिद्‌वार, काशी, कांची, अवंतिका (उज्जैयिनी), द्‌वारावती (द्‌वारका)

14. खंडोबाची चार स्थाने - जेजुरी, निमगाव, पाली, पेंबूर

# संकष्टी, अंगारकी आणि विनायकी चतुर्थी

प्रत्येक महिन्याच्या पंधरवाड्यात वद्‌य पक्षात चतुर्थी येते, तिला संकष्टी चतुर्थी तर वद्‌य पक्षात संकष्टी चतुर्थी मंगळवारी आल्यास तिला अंगारकी चतुर्थी म्हणतात. संकष्टी किंवा अंगारकी

चतुर्थीचा उपवास रात्री चंद्रोदय झाल्यानंतर चंद्राचे दर्शन घेऊन सोडण्याची प्रथा आहे. ही दोन्ही व्रते पाच प्रहरांची असून चंद्रोदय झाल्यानंतर भोजन करावे, असे मुद्‍गलपुराणात सांगितले आहे. संकष्टी चतुर्थी वद्य पक्षात येते, तर विनायकी चतुर्थी शुक्ल पक्षात येते. विनायकी चतुर्थीचे व्रत हे अहोरात्र असल्यामुळे त्या दिवशी एकादशीप्रमाणे संपूर्ण दिवस व रात्रीही उपवास करून दुसऱ्या दिवशी सकाळी तो सोडण्यात येतो. भाद्रपद महिन्यात शुक्ल चतुर्थीला गणेश चतुर्थी म्हणतात.

## विविध देवतांचे पूजनाचे दिवस व उपवास

रविवारी सूर्यदेवाची, सोमवारी शंकराची, मंगळवारी देवीची, बुधवारी विठ्ठलाची, गुरुवारी दत्तात्रयाची, शुक्रवारी देवीची, शनिवारी शनिदेवाची किंवा मारुतीची पूजा किंवा उपासना केली जाते. आषाढी ते कार्तिक अशा चार एकादशा आणि महाशिवरात्री असे पाच उपवास हिंदू संस्कृतीत किंवा विशेषेकरून महाराष्ट्रात पाळले जातात.

## चौदा विद्या

ज्या चौदा विद्यांचा अधिपती म्हणून श्रीगणेशाचं नाव आपण घेतो, त्या अशा -

1. ब्रह्मज्ञान, 2. रसायन, 3. श्रतिकथा, 4. ज्योतिष, 5. वैद्यक, 6. व्याकरण, 7. धनुर्विद्या, 8. संगीत, 9. हयाधि अश्वारोहण, 10. पयःसंचार, 11. नाटक, 12. चोरी, 13. कोक, 14. पटुत्व.

## चौसष्ट कला

ज्या चौसष्ट कलांचा अधिपती म्हणून श्रीगणेशाचं नाव आपण घेतो, त्या अशा -

1. गीत, 2. वाद्य, 3. नृत्य, 4. नाट्य, 5. आलेख- रेखाकर्म, 6. गोंदणे, 7. तांदूळ रचना किंवा फुलोरा रचणे, 8. पुष्पांची शेज, 9. अंगरंजन (मेंदी लावणे), 10. रत्नखचित फरसबंदी, 11. जिन्नस शिस्तीने लावणे, 12. जलतरंग, 13. प्रवेशातील देखावे, पडदे आदी तयार करणे, 14. पाणी कोंडणे, 15. चित्रकला, 16. हार-तुरे तयार करणे, 17. फुलांची कर्णभुषणे तयार करणे, 18. पेये, आसवे तयार करणे, 19. कशिदा, 20. भरतकाम, मोर इ. चित्रे कापडावर भरणे, 21. सुगंधी द्रव्ये तयार करणे, 22. वीणा वादन, 23. कोडी, उखाणे इत्यादी सोडविणे, 24. मूर्ती, पुतळे इत्यादी ओतणे, 25. उकविद्या, 26. वाचन, 27. ऐतिहासिक प्रवेश किंवा देखावे तयार करणे, 28. समस्यापूर्ती, 29. दांडपट्टा, बोथाटी खेळ करणे, 30. बगिच्याचे ज्ञान, 31. मंत्र, यंत्र, तंत्रज्ञान, 32. काव्यकल्पना, 33. नजरबंदी, 34. कोटीबाजपणा, 35. सुतारकाम, 36. बांधकाम, 37. रत्नपरीक्षा, 38. धातुपरीक्षा, 39. रंगीत रत्ने तयार करणे, 40. मुलांचे खेळ, 41. खाणीची परीक्षा, 42. वृक्षपरीक्षा, 43. टकरी लावण्याचे कसब, 44. मैना-पोपट आदींना बोलावयास शिकवणे, 45. उत्साह उत्पन्न करण्याचे कसब, 46. केशरचना, 47. भिन्न भाषाज्ञान, 48. पगडबंदी, 49. वेगवेगळे गंध तयार करणे, 50. शृंगार साजाची रचना, 51. इंद्रजाळ, जादूनगरी, 52. बहुरूप्याचे कसब, 53. हातचलाखी, 54. पाककौशल्य, 55. मुठीतले गुपित ओळखणे, 56. देशभाषेचे सांगोपांग ज्ञान, 57. छंदोरचना ज्ञान, 58. हरहुन्नर कसब, 59. वस्त्रे तयार करणे, 60. फासे खेळण्याचे कसब, 61. वशीकरण, 62. तौलनिक भाषा, विज्ञान, 63. चेटूक, 64. जारण-मरण.

# श्रीगणेशाला प्रिय असणारी फुले

श्रीगणेशाला भक्तिभावाने फुले, पत्री, दुर्वा वाहिल्या जातात. त्यात जी फुले वाहतात त्यांचे प्रकार एकवीस आहेत, ते असे -

1. चंपक - सोनचाफा, 2. शतपुष्प - पांढरे कमळ, 3. कल्हार - तांबडे कमळ, 4. पुन्नाग - उंडी-उंडल, 5. पुगपुष्प - सुपारी, 6. मल्लिका - मोगर, 7. करवीर - कन्हेर, 8. गिरिकर्णिका - गोकर्ण, 9. इंद्रिका पुष्प - आंब्याचा मोहर, 10. गोविंद पुष्प - कवळा, 11. जातिका पुष्प - जाई, 12. केतकी - केवडा, 13. मालती - मधुमालती, 14. बकूळ - बकूळ, 15. जपा - जास्वंद, 16. नागकेशर - नागचाफा 17. धत्तुर - धोत्रा, 18. पारिजातक - प्राजक्त, 19. अनंत - अनंत, 20. शतफा - शेवंती, 21. नंघावर्त - नांदुरकी.

□□□

# गणपतीची आरती

तू सुखकर्ता तू दुःखहर्ता विघ्नविनाशक मोरया ।
संकटी रक्षी शरण तुला मी गणपतीबाप्पा मोरया ।।धृ।।
मंगलमूर्ती तू गणनायक । वक्रतुंड तू सिद्धिविनायक ।
तुझिया द्वारी आज पातलो । नेई स्थितप्रती राया । संकटी ।।1।।
तू सकलांचा भाग्यविधाता । तू विद्येचा स्वामी दाता ।
ज्ञानदीप उजळून आमुचा । दीपवी नैराश्याला । संकटी ।।2।।
तू माता तू पिता जगीया । ज्ञाता तू सर्वस्व जगी या ।
पामर मी तव गुण गायने । तुझी आरती गातो मोरया ।। संकटी ।।3।।

□□□

# श्री समर्थ रामदासस्वामी रचित आरती

सुखकर्ता दुखहर्ता वार्ता विघ्नाची ।
नुरवी पुरवी प्रेम कृपा जयाची ।।धृ।।
सर्वांगी सुंदर उटी शेंदुराची ।
कंठी शोभे माळ मुक्ताफळांची ।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।।
दर्शनमात्रे मनःकामनापूर्ती ।।धृ।।
रत्नखचित फरा तुज गौरी कुमरा ।
चंदनाची उटी कुंकुम केशरा ।
हिरेजडित मुकुट शोभतो बरा ।
रुणझुणती नुपूरें चरणी घागरिया ।। जय देव ।।2।।
लंबोदर पीतांबर फणिवरबंधना ।
सरळ सोंड वक्रतुंड त्रिनयना ।
दास रामाचा वाट पाहे सदना ।
संकटी पावावे निर्वाणी रक्षावें सुरवर वंदना ।।
जय देव जय देव जय मंगलमूर्ती ।।3।।

□□□

# कै. गजाननशास्त्री पुंडरचित
# चिंतामणीची आरती

जय भगवान चिंमामणी देवा वरदेशा ।
पंचारती करितो तुज कदम्बक्षेत्रेशा ।।धृ।।
शचिपत अमरेश्वर जो स्वर्लोकाधीश ।
शापविमोहे नारद वाक्ये मोहवश ।।
होऊनी गेला गौतम-भार्या संगसुखा ।

भोगवी परिगती लाभे घे जी सन्मतीविमुखा ।।

जय भगवान ।।

बहुकाले गौतमनुत गाणप चितगत ।
गणनाथ प्रभु गौतम-स्वीकृत सुरनाथ ।
जाणुनी दर्शन देई इंद्रा मुदभरित ।।
झाला इंद्रही तेव्हा जो का अनुतप्त ।।2।।

जय भगवान ।।

तत्कृत अद्य भयंकर ते तत्क्षणि नाशाया ।
प्रकटे चिंतामणीचे तीर्थही निकजाया ।।
धरुनी पावन केले इंद्र क्षणमात्रे ।
देही सुंदर झाला तो दशशत नेत्रे ।।3 ।।

जय भगवान

रुक्मांगद राजा जो गाणापतवीर ।
छळिला मुनिपत्नीने परि न त्याजि धीर ।।
सत्वा, रक्षियला मग जरि शापे तस्त ।
पूर्वज दोषे तो परि तीर्थे हो स्वस्थ ।।4।।

जय भगवान

गुरु गुरुभार्याविक्रम शापज मोहमल ।
परमार्थदूषणही जरि अद्य ते अतुल ।।
नाशी अनुतप्ताचे तीर्थ असे प्रबल ।
चिंतामणी तीर्थेश्वर प्रभूही गणपाल ।।5।।

जय भगवान

चिंतामणी चिंतीतदा हे सर्वाधीशा ।
नाशी मम अद्यनग हा पावन तीर्थेशा ।।
क्षमुनी सकला न्याया करि करुणा भारी ।
प्रार्थी बाल अखंडित गणपता सारी ।।6।।

जय भगवान

□□□

# लेखक प्राचार्य डॉ. पवन मांडवकर

# यांचा अल्पपरिचय

**नाव :** डॉ. पवन भाऊ मांडवकर

**कार्यालय :** प्राचार्य, इंदिरा महाविद्यालय, कळंब, जि. यवतमाळ ४४५४०१

**निवास :** 'पद्मनिलया', ४२, शिवाजी नगर, यवतमाळ ४४५००१

**भ्रमणध्वनी :** ९४२२८६७६५८

**E Mail**: pavanmandavkar@yahoo.com

**शिक्षण :** एम.ए. मराठी, एम.ए. इंग्रजी, बी.एड., पीएच.डी. मराठी : 'दया पवार : वाङ्मयदर्शन आणि चिकित्सा', नेट मराठी

**प्रकाशित पुस्तके :**

**बालकथा :** गाढव गोष्टी, झंपू, गंमत गोष्टी, संस्कारशील श्याम, गौरीची दिवाळी

**कादंबऱ्या :** डेड लॉक, विरह, अपूर्ण संघर्ष, दीपशिखा, मी अनामिका बोलतेय

**कथासंग्रह :** दामूअण्णा (विनादी), ब्यांड मास्तर (उत्कृष्ट कथासंग्रह म्हणून राज्यस्तरीय पुरस्कारप्राप्त), परीचे पंख

**लेखसंग्रह :** आनंदाचे डोही : दुःखाचा तरंग

**काव्य :** प्रेम कविता, किलबिलाट (बालकाव्य) (बालकाव्य - साहित्य संस्कृती मंडळ अनुदानित)

**अभ्यासात्मक :** संशोधनात्मक संदर्भग्रंथ : झटपट शुद्धलेखन, झटपट पत्रलेखन, झटपट मराठी शुद्धलेखन, ठळक शुद्धलेखन, झटपट निबंध, दया पवार, अर्वाचीन मराठी कविता : १८८५ ते १९३५ : एक दृष्टिक्षेप, बहिणाईची गाणी : सौंदर्य आणि समीक्षा, दया पवार : वाङ्मयदर्शन आणि चिकित्सा (यूजीसी अनुदानित प्रबंध) दलित कथा आणि विटाळ, महाविद्यालयीन कार्यप्रणाली

**संकीर्ण :** धमाल वार्ता, छान छान नावे बाळांची, एका रखेलीची (आत्म)हत्या!, वास्तुशास्त्रातील ठळक संकेत, हसणावळ, शेतकऱ्यांच्या आत्महत्या

**अनुभव-आठवणी-माहितीपर :** अण्णा हजारेंचे राळेगणसिद्धी, सद्दाम हुसैन, शरद पवार, शरद जोशी

**संशोधनपर धार्मिक :** शनिशिंगणापूर, श्री क्षेत्र चिंतामणी कळंब, वैदर्भीय अष्टविनायक, श्री क्षेत्र माहूरगड, कथा पुंडलिकाची

**ग्रंथ संपादन :** घरगुती व्यवसाय (शालेय जीवनात केलेले पहिले संपादन), ओंजळ (प्राति. काव्यसंग्रह), गंधाली (प्रातिनिधिक चारोळीसंग्रह), सिंधू (गौरवग्रंथ), मराठी प्राध्यापक सूची, दलित, ग्रामीण आणि प्रादेशिक साहित्य, संत साहित्य, ग्रामीण साहित्याचे मराठी वाङ्मयात योगदान (राष्ट्रीय परिषदेची स्मरणिका), अध्यक्षीय भाषणे

**पुरस्कार :** विदर्भ संत साहित्य संमेलन अंजनगावसूर्जी - 2001 सन्मानपत्र, आध्यात्मिक सहजसमाधी विश्व- विद्यापीठाचा आचार्य काव्यरत्न पुरस्कार - 2004, म. ज्योतिबा फुले शिक्षाविद पुरस्कार, चतुर्थ अखिल भारतीय प्रतिभा सम्मान पुरस्कार समारोह, इन्दौर - 2007, साहित्य गौरवपत्र - साहित्यप्रेमी सार्वजनिक वाचनालय, इस्लामपूर - 2007, सर्वोत्कृष्ट कथासंग्रह पुरस्कार - ब्यांड मास्तर - साहित्यप्रेमी सार्वजनिक वाचनालय, इस्लामपूर - 2007, शासकीय रक्तदान शिबिर आयोजक सन्मानपत्र - 2015, कोव्हिड योद्धा सन्मानपत्र - 2021, विविध क्षेत्रातील सन्मानचिन्हांनी पुरस्कृत

**विशेष :** १. वयाच्या सतराव्या वर्षी भारतीय वायुसेनेत सेमी टेक्निशियन म्हणून भरती होऊन सात वर्षे देशसेवा, दरम्यान मद्रास, चदिगढ आणि पाकिस्तान-राजस्थान सीमेवर उतरलाई येथे कार्यरत

२. विश्वस्त, डॉ. य.मो. दोंदे सार्व. शै. ट्रस्ट, कळंब

३. अध्यक्ष, जयसेवा वाचनालय, अमरावती

४. संस्थापक अध्यक्ष, डॉ. भाऊ मांडवकर संशोधन केंद्र, कळंब, जि. यवतमाळ

५. विश्वस्त, श्री सरस्वती मंदिर, कळंब

६. अध्यक्ष, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी प्राध्यापक परिषद

७. संस्थापक अध्यक्ष, आदर्श संघटना, विजय कॉलनी, अमरावती

८. संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ मराठी अभ्यास मंडळ सदस्य

९. आकाशवाणी नागपूर व आकाशवाणी यवतमाळवरून अनेक कथांचे, भाषणांचे प्रसारण

१०. अनेक अभ्यासात्मक, प्रेरणादायी व सैन्य दलाशी संबंधित युट्युब विडिओज

११. माजी सदस्य, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ रासेयो सल्लागार समिती

१२. कार्यकारी मंडळ पदाधिकारी - रमेश खवणे वाचनालय, कळंब, जि. यवतमाळ, इंदिराबाई दोंदे वाचनालय, मूर्तिजापूर, जि. अकोला, प्राचार्य फोरम, अमरावती विद्यापीठ

१३. संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ आचार्य पदवी मार्गदर्शक

□□□